# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २७/२/२००७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.२२) इतिवृत्त

**मंगळवार** दिनांक **२७ फेब्रुवारी २००७** रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.रेणुकादास (राजू) वैद्य** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **दुपारी ४.३० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. गायकवाड दिलीप नारायण
2. श्री. गवळी रविकांत काशीनाथ
3. सौ. दलाल लता श्रीनिवास
4. श्री. दाभाडे मिलींद यशवंत
5. श्री. मुजीब आलमशाह खान
6. श्री. पांडे विनायक प्रभाकर
7. श्री. शिरसाट संजय पांडूरंग
8. डॉ. आशा उत्तमराव बिनवडे
9. श्री. दाभाडे हिंमतराव साळूबा
10. श्री. बमणे पुनमचंद सोनाजी
11. श्री. सावंत मधुकर दामोधर
12. श्री. मो. जावेद मो. इसाक
13. श्री. हाजी शेरखान अ. रहेमान

**<u>g§dmX :</u>**

श्री.हिम्मतराव दाभाडे : शासन सम्राट पेपर मध्ये बातमी आलेली आहे बौध्दनगर, उत्तमनगर तसेच विष्णुनगरचा भाग येतो नाल्याच्या बाजूला संरक्षित भिंतीचे काम चालू आहे. ठेकेदार बांधकामामध्ये मातीचा उपयोग करीत आहे. कोणत्या प्रकारे काम चालू आहे या बाबत अधिकाऱ्यानी जवून चौकशी केलेली आहे काय ?

कार्य.अभियंता (ड्रेनेज) : विष्णुनगर भागातील नाल्याचे पाणी पावसाळयात लोकांच्या घरात जते म्हणून नाल्यातील अतिक्रमण काढून नाल्याचे काम करण्याचे ठरविले होते काम सूरू केले आहे.आज्च काही नागरीक कार्यालयात आले होते. सदरचे काम स्पेसीफिकेशन प्रमाणे होत नसेल तर तोडून टाकून नवीन काम करण्यात येईल.

श्री.पुनमचंद बमणे :हर्सुल वार्डाचे पाणी पुरवठा का बंद केलेला आहे तसेच सर्व शिक्षा अभियान अंतर्गत हर्सूल वार्डात शाळेच्या इमारतीचे काम चालू होते ते का बंद आहे. दोन दिवसापासून पाणी नाही.

कार्य.अभियंता(पापु.) : याची मला कल्पना नाही अर्ध्या तासात माहिती देतो.

मा.सभापती : अर्ध्या तासात माहिती घेवून कार्यवाही करावी.

श्री.विनायक पांडे : बेगमपूरा, निपटनिरंजन तसेच विद्युत कॉलनी भागात पहाडसिंगपूरा येथील पाण्याच्या टाकीवरून पाणी दिले जते. सदर टाकी ही पंपीगद्वारे भरली जते.आठ दिवसापासून पाणी नव्हते. दर आठवडयात एक दोन दिवस पाणीच येत नाही. त्यामूळे नागरीकांना त्रास होतो. त्या भागात ७ ते ८ विहीरी असून त्या अधिगृहीत करून महापालिकेचे तेथे पंप बसविल्यास किमान दोन तीन गल्ल्यामध्ये तेथेच पाणी मिळेल. ज्युब्ली पार्कच्या टाकीच्या पंपाचे पावर वाढविले तर हनुमान टेकडी वरील टाकी भरण्यास मदत होईल त्या दृष्टीने बजेट मध्ये तरतूद करावी.

मा. सभापती : याची अंमलबजवणी होण्याच्या दृष्टीने जेकरता येईल ते प्रशासनाने करावे.

श्री.मुजीब खान : दिल्लीगेट येथील पाण्याच्या टाकीवर जूनी ६० एच.पी. पावरची मोटार असून कमी दाबाने पाणी येते. त्या ठिकाणी १०० एच पी पावरची मोटार बसवावी.हर्सूल तलावातील माती काढण्याचे टेंडर दिले होते. तेथील मल्ल लोकांनी माती काढू दिली नाही. संबधीतांनी टेंडर मागे घेण्याची विनंती केली. माती उचलली नसून त्यांचे डिपॉजीट आहे तेही परत केले नाही. मोबदला देवून माती घेण्यास लोक तयार आहेत.

कार्य.अभियंता(पापु.) :दिल्लीगेट येथील टाकीचा पंप जूना असून त्याचा डिस्चार्ज वाढविण्यासाठी प्रयत्न करून पाहतो.

श्री.मो.जवेद मो.इसाक :१९६२ ची पिठाच्या गिरणीची विद्युत मोटार आहे अशी माझी माहिती आहे.

मा. सभापती : नवीन विद्युत मोटार लावण्याची कार्यवाही करावी.

श्री.विनायक पांडे : हर्सुल तलावाच्या बाजूला मल्लाव लोकांनी अतिक्रमण केलेले आहे. पैसे भरणा करून बाड लावतात. त्यांचे तेथे जमीन असून त्या बाबत न्यायालयात वाद चालू आहे. माती उचलण्यास ते प्रतिबंध करीत नाही. जेंव्हा तेथे पाणी कमी होते व पीक असते तेंव्हाच माती काढण्यास विरोध करीत असतील अशी माझी माहिती आहे.

श्री.मुजीब खान : माती काढू देत नाही म्हणून पाणी साठा जस्त होत नाही. माती त्वरीत काढावी जेणे करून पाणी साठा जस्त होईल.

श्री.पुनमचंद बमणे : विनामूल्य माती लोकांना द्यावी. तेथे बाड लावण्यामूळे पाणी खराब होते.

श्री.हिम्मतराव दाभाडे : पडेगांव भागात एक माजे सैनिक आहे. घराला टॅक्स लावावा म्हणून अनेकदा त्यांनी मागणी केली. तरी टॅक्स लावण्यात यावा. तसेच माजे सैनिकांच्या कॉलनीजवळ रस्त्यावर दुकानाचे अनधिकृत काम चालू आहे. ते थांबविण्याची कार्यवाही होत नाही. अधिकारी जतात परत येतात.

श्री.मुजीब खान : माजे सैनिकांच्या घरांना टॅक्स आकारणी करू नये असा निर्णय सर्वसाधारण सभेने घेतला त्याची अंमलबजवणी अद्याप झाली नाही. तसेच गुंठेवारी भागातील लोकांचे पैसे घेत आहे परंतू अतिक्रमणाचे पैसे घेणार नाही म्हणून निर्णय घेतला असतांना वसूल केले जत आहे.

मा. आयुक्त : अतिक्रमण म्हणून पैसे वसूल केले व घर गुंठेवारीत रेग्यूलर केल्यास भरलेले पैसे गुंठेवारीच्या फिसमध्ये समायोजन केले जईल.

श्री.मुजीब खान : लोक अतिक्रमणाचे पैसे भरल्याची पावती घेवून जतात व गुंठेवारीत येण्यास तयार आहे परंतू अतिक्रमणाचे पैसे गुंठेवारीत समावेश करून घेतले जत नाही. मा.आयुक्तांचे अद्याप आम्हाला आदेश नाही असे झोन अधिकारी सांगतात.

श्री.संजय शिरसाट : ९ तारखेच्या आसपास बाजर व बाजराचे वाहन तळाचे टेंडर काढले गेले. त्यात पीरबाजरचा ही समावेश होता. तेथील ठेका मूळ मालकास दिला आहे म्हणून एकाही व्यक्तीला टेंडर फॉर्म दिले गेले नाही.टेंडर कूणास दिलेले आहे व त्यास कूणाची मान्यता घेतलेली होती.

मालमत्ता अधिकारी : ३१.३.२००६ रोजेच्या स्थायी समितीचा ठराव क्र ३२० हा ठराव पारीत केलेला आहे. त्यात असे की प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहानूरवाडी भागात जगेवरील बोओटीचे काम व निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत दि. १.४.२००६ पासून प्रति बाजर ११ हजर ची वसूलीचे काम करणारे ठेकेदार श्री. संतोष प्रभाकर मांजरे यांना जुन्या अटी शर्तीसह मुदतवाढ देण्याचे मान्य केले आहे.

मा. सभापती : सभागृहात विषय आला होता त्यास मंजूरी दिलेली आहे.

श्री. संजय शिरसाट :१० वर्ष बीओटीचे काम त्या जगेवर झाले नाही तो व्यक्ती न्यायालयात दाद मागतली तर एकाच व्यक्तीला ठेका देत राहणार का? अधार काय आहे ठेका दयायचा नव्हता तर निविदा का मागविली, फॉर्म घेण्यासाठी आले असता स्थायी समितीची रूलींग दाखवली जते.

मा. आयुक्त : यात असे की ऑलरेडी स्थायी समितीने मुदतवाढ दिलेली आहे.

श्री. संजय शिरसाट : तसे ठरावात नाही. बीओटीच्या जगेचा व बाजरच्या जगेचा तसा काही संबध नाही. वेगळी जगा आहे.तेथे दुकाना आहे बाजराची जगा वेगळी आहे.तेथील बाजराचा ठेका देण्यास काय अडचण आहे. एकीकडे टेंडर मागवायचे व लोक मागणी करावयास आले तर स्थायी समितीची रूलीग दाखवायची हे बरोबर नाही.

मा. सभापती : स्थायी समितीच्या ठरावाची अंमबजवणी करायची होती तर टेंडर का काढलेले आहे.

मालमत्ता अधिकारी : यात माझी चूक झालेली आहे. मान्य करतो.

श्री.संजय शिरसाट : ज्या व्यक्तीला मुदतवाढ देणार आहात त्यात कूठेही उल्लेख नाही किती दिवसासाठी दिलेले आहे. यासाठी मा. आयुक्तांची मान्यता घेतली होती का?

मा. आयुक्त : ३१ मार्च पर्यंत काम सुरू झाले नाही तर त्या बाजराचे नवीन दर ठरवले जईल. जेपर्यत बीओटीवर तेथील काम होत नाही तोपर्यत तेथील टेंडर काढावे स्थायी समिति समोर यायला पाहिजे स्थायी समितीने रेट अंतिम केले ते त्याच एक वर्षासाठी असावयास पाहिजे दर वर्षी काही प्रमाणात वाढ केली पाहिजे

श्री.संजय शिरसाट : स्थायी समितीने जे निर्णय घेतला त्यात एक वर्षाचा कूठेही उल्लेख केलेला नाही बीओटीवर काम सुरू होण्यास वेळ आहे असे जरी असेल तरी दर वर्षी १० टक्के दर वाढवितो. मा. आयुक्तांची मंजूरी घ्यायला पाहिजे या दूरूत्या कूणी करायच्या.११ हजर रूपये दर कसे गृहीत धरण्यात आले व त्यास मुदतवाढ देणेसाठी मा.आयुक्तांची मान्यता का घेतलेली नाही.

मा. आयुक्त : १ वर्षा पर्यंत स्थायी समितीचा निर्णय ग्राहय धरू. त्यानंतर दर वाढवायचे की नाही हे स्थायी समिती समोर येईल.

प्र. मालमत्ता अधि. : संबधीत व्यक्तीला मुदतवाढ अजून दिलेली नाही.

श्री.संजय शिरसाट : निविदा काढल्या त्याची जबाबदारी कूणावर फिक्स करणार आहे.

मा. आयुक्त : एक वर्षासाठी गृहीत धरून १० टक्के वाढ करून निविदा काढून स्थायी समितीसमोर ठेवण्यात येईल. तसेच जेपर्यंत काम सुरू होत नाही तोपर्यंतच हा ठेका

राहिल. असे नमूद करून पूढील आठवड्यात तसा प्रस्ताव येईल. अधिकाऱ्यांनी त्यांची चूक मान्य केलेली आहे.

श्री.संजय शिरसाट : चूक मान्य केली म्हणून विषय संपवायचा का?

सौ. लता दलाल : पान क्र ९ वर दै.सामना यामध्ये एक बातमी आली होती त्या अनुषंगाने या सभागृहात चर्चा झाली होती. द्रारिद्र्य रेषेखालील सर्व्हेबाबत प्रकल्प संचालक यांना माहिती मागवली होती. ती त्या बैठकीत दिली गेली नाही म्हणून या बैठकीत ठेवण्याचे आदेशीत केले होते. माझ्या वार्डात एक काम चालू आहे. ती जगा माझ्या माहिती प्रमाणे महापालिकेने संपादन केली अतिक्रमणे काढली. तेथे वाहतूक बेट, पार्कींग करणार आहोत.

प्रकल्प संचालक : मागिल बैठकीत स. सदस्य श्री. सावंत यांनी सर्वेक्षणाच्या फॉर्मची छायाप्रत मागविली होती. ती मा. सभापती मा. आयुक्तांकडे सादर केलेली आहे. मा. आयुक्ताच्या आदेशानूसार पून्हा सर्वेक्षणाचे काम केले. वृत्तपत्रातही काही लोकांची नावे आलेली होती. पून्हा पडताळणी केली असता १२ लोक अपात्र असून त्यांना वगळण्याचे आदेशही दिलेले आहेत.

श्री.संजय शिरसाट : जर फॉर्म मा.आयुक्तांकडे किंवा मा.सभापतींकडे भरून दिला. त्यावर स.स.मधुकर सावंत यांनी आक्षेप घेतलेला असेल, त्यांची त्यावर सही असेल तर त्यांनी त्याचा फायदा घेतलेला आहे. जर घेतलेला नसेल तर कर्मचाऱ्यांनी फॉर्म चूकीचा भरलेला आहे प्रशासनाने मान्य केले का?

प्रकल्प संचालक : त्या फार्मवर सौ.शोभा सावंत यांचा अंगठा आहे.

श्री.मधुकर सावंत : माझा आरोप आहे, बीपीएल चा सर्वे करून काम केलेले नाही. एका ठिकाणी बसून मतदार यादीतून नावे काढून यादी तयार केलेली आहे असे वाटते.

श्री.संजय शिरसाट : आताच १२ लोक अपात्र होते म्हणून खूलासा झाला. ते उदाहरण दिले परंतू यात कोण सहभागी आहेत. त्यांचेवर पोलीस कार्यवाही करावी किंवा सही अंगठा तपासणी करणारे तज्ज्ञांकडून तपासणी करावी म्हणजे या बरोबर अनेक प्रकरण उघडकीस येतील. जे दोषी असेल ते शिक्षा भोगतील.

प्रकल्प संचालक : शिक्षण विभागात काम करणाऱ्या बालवाडी शिक्षीकांनी सर्वेचे काम केले आहे. सुपरवायझर म्हणून श्री.दिक्षीत नावाचे स्वच्छता निरीक्षक होते. १० टक्के पुन:र्सर्वेक्षणाची त्यांनी पडताळणी करावी असे अपेक्षीत होते. त्यानंतर विभागीय अधिकारी यांना संपूर्ण वार्डाचा सर्वे करून घेण्याचे काम सोपवले आहे.

मा. आयुक्त : अंगठा ज्यांचा आहे त्यांचे नाव नाही असे म्हणणे आहे ते तपासणे जस्त अवघड नाही. वस्तुस्थिती असेल किंवा चूक असेल.

सौ. लता दलाल : सर्वे करतांना नॉर्मस् प्रमाणे सर्वे केलेला नाही हे तेंव्हाच संबधीत अधिकाऱ्याच्या लक्षात का आले नाही. आयुक्त म्हणून आपलीही ही जबाबदारी आहे.

मा. आयुक्त : जे सर्वे करतो त्यांचेकडून त्यांनी चौकशी किंवा फॉर्म पूर्ण भरून घेणे हे अपेक्षीत नसते. ज्यांनी फॉर्म भरून दिला त्याची सही घेतली जते. माहिती त्या व्यक्तीने द्यावी. तो बीपीएल मध्ये आहे किंवा नाही हे डिक्लेर केले जत नाही. ती यादी संगणकावर तयार

करून शासनाकडे पाठवली जते. शासन तपासणी करून डिक्लेर करतील. आपल्या अधिकाऱ्यानी चौकशी करून क्रॉस चेकींग करून घेणे अभिप्रेत नाही.

प्रकल्प संचालक : एकूण सर्वेक्षणाच्या १० टक्केच सर्वेक्षण जे कूणी करेल त्यांनी करायचे असते. त्याप्रमाणे केलेले असून तसा अहवाल त्यांनी दिलेला आहे.

श्री.संजय शिरसाट : अधिकारी प्रशासनाला मिसगाईड करतात. फॉर्म भरणा केल्यानंतर बीपीएल मध्ये तो व्यक्ती येतो असे नाही. त्यानी दिलेली माहिती बरोबर आहे काय याची तपासणी सर्वेक्षकानी करायची असते.

मा. आयुक्त : १० टक्केमध्ये जी संबधीत व्यक्तीनी माहिती दिली त्यात त्यांचेकडे सर्वेक्षण करणारा गेले की नाही हे असते. त्यांनी जी माहिती दिली त्या अधारेच माहिती नोंद होते. टी. व्ही नाही म्हटले तर ते आहे की नाही हे घरी जवून बघणे हे सर्वेक्षण करणाराचे काम नसते. १०० टक्के लोकांच्या भरवश्यावर फॉर्म भरणा करून घेत असतो. त्यांचे उत्पन्न किती आहे हे आपल्या कर्मचाऱ्यानी तपासणी करणे काम नाही. एखादयाने २००० हजर पतीचे व दोन हजर माझे उत्पन्न आहे हे उलट तपासणी करणे कर्मचाऱ्याचे काम नाही.

श्री. मधुकर सावंत : वार्डातील १० लोकांनी माझ्याकडे अर्जदिले व त्याबरोबर शिफारस पत्र देवून यादीत नाव घेण्या बाबत मी पत्र दिल्यानंतर तपासणीसाठी जेकर्मचारी येतात. गॅस, दुरध्वनी, वाहन तसेच आरसीसीचे घर नसले पाहिजेअसे सांगतात. परंतू सर्वेसाठी गेल्यानंतर घर कशाचे आहे घरात दुरध्वनी आहे की नाही गॅस आहे की नाही हे समोरच दिसून येते. तरी त्या लोकांची नावे आलेली आहे. एका ठिकाणी बसून हा सर्वे झालेला आहे.

मा. सभापती : प्रकल्प संचालक यांनी त्यावेळचे झोन अधिकारी, पर्यवेक्षक, प्रगणक कोण होते त्यांना स.सदस्य श्री. सावंत यांना मा.आयुक्तांच्या दालनात बोलवून नेमका हा प्रकार कशामूळे कूणामूळे झाला याची विचारणा करावी. जे दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.मधुकर सावंत : सर्वे केल्या प्रमाणे ५० ते ६० टक्के लोक दारीद्रय रेषेखाली आहे एवढी संख्या आहे का? ६०% सर्वे मध्ये आरसीसी नसलेले घरे दाखवलेले आहे.

मा. आयुक्त : सर्वे झाला म्हणजे ते बीपीएल मध्ये आले असा अर्थ होत नाही. माहिती भरून घेतल्यानूसार संगणकात यादी तयार करून शासनाकडे पाठवून त्यात किती लोक बसतात हे शासनाकडून जहीर होईल.

श्री.मधुकर सावंत : झोन क्र ४ मधून मला पत्र आले की आपल्या वार्डातील दारीद्रय रेषेखालील लोकाची यांदी लावलेली आहे यादी बघीतली असता ५० टक्के लोक माझ्या वार्डातील राहिलेले आहे.त्यांची नावेच आलेली नाही. ते लोक सकाळी कामाला जतात संध्याकाळी घरी येतात.

मा. सभापती : स. सदस्यांनी आठ दिवसाची वेळ मागवून घेतलेली आहे संबधीत अधिकारी यांनी त्यांचे वार्डात जवून संपूर्ण सर्वे करावा.

श्री.मुजेब खान : शासनाचे डायरेक्शन काय आहे व सर्वे केला यात काय फरक जणवतो याची माहिती द्यावी.

मा. आयुक्त : संबधीत नागरीकाकडून फॉर्म भरून घेतल्यानंतर अमुक कुटूंब हे बीपीएल मध्ये येते महानगरपालिका डिक्लेर करणार नाही.

श्री.मुजीब खान : सर्वेक्षण करतांना यासाठी शासनाचे डायरेक्शन असतील त्यात व सर्वे केल्यात काही फरक दिसून येतो का जेलोक बीपीएल मध्ये बसतात त्यांचीच यादी शासनाकडे द्यावी लागेल.

प्रकल्प संचालक : २ एप्रिल २००५ चा शासन जी. आर आहे. त्याची प्रत सर्व सदस्यांना दिलेली असून यात सर्वे कसा करावा या बाबत गाईडलाईन्स दिलेल्या आहेत.प्रामुख्याने माहिती गोळा करणेची जबाबदारी महानगरपालिकेवर दिली होती. शासन त्या यादीतून कोण बीपीएल मध्ये येते हे निश्चित करणार आहे.जर एखादे कुटूंब म्हणत असेल मी दारीद्रय रेषेखाली येतो माझे इतके उत्पन्न आहे जेंव्हा ते सम्मती देतात तेंव्हा त्यांचे प्रपत्र भरले जतात.बालवाडी शिक्षीका किंवा क. लिपीक यांनी हे प्रपत्र भरूण घेतलेले आहे. यावर देखरेख करण्यासाठी स्वच्छता निरीक्षक किंवा लिपीक असतील. त्यानंतर विभागीय अधिकारी यांचेवर ही जबाबदारी देण्यात आली होती. प्रपत्र भरून घेत असतांना जेकुटूंब प्रमुख आहे ते जी माहिती देतील ती प्रगणक यांनी भरून घ्यायची असे शासनाच्या प्रशिक्षणामध्येही डायरेक्शन दिलेले आहे.

श्री.मुजीब खान : शासनाचे डायरेक्शन काय आहे त्यात किती उत्पन्न अपेक्षीत असावयास पाहिजे कोणत्या संवर्गातील कुटूंबाचाच सर्वे केला पाहिजे

प्रकल्प संचालक : ज्या कुटूंबाचे उत्पन्न दरमहा ५९१रू. ७५ पैसे इतके आहे त्याचा यात समावेश होवू शकतो. जी माहिती दिली जते त्या अधारे शासन ठरवते की कोणते कुटूंब दारीद्रय रेषेखाली येते.

श्री.मधुकर सावंत : कोणते कुटूंब दारीद्र्य रेषेखाली येते हे महापालिका निश्चित करीत नाही. ज्यांनी अर्ज दिला त्यांचे नाव यादीत टाकून शासनाकडे पाठवावे.

मा. आयुक्त : भरलेला फार्म ची नोंद संगणकामध्ये होईल त्यानंतर शासनाकडे पाठूवन दिले जतात.

श्री. मुजीब खान : जे सर्वे केला तो त्यात जेबीपीएल मध्ये येतात ते आलेले नाही. शासनाकडे यादी पाठवल्यानंतर त्यात मंजूरी मिळणारच आहे. जे यात येत नाही त्याची नावे येतील. त्यासाठी सर्वे करतांना जे खरोखरच बीपीएल मध्ये येतात त्यांचीच नावे शासनाकडे गेली पाहिजेअशी सभागृहाची भावना आहे.

श्री.मधुकर सावंत : चूकीचा सर्वे झालेला आहे पून्हा करावा नसता जेअर्ज देतील त्यांचे नाव समावेश करून घ्यावे.

मा. आयुक्त : मागिल बैठकीनंतर या बाबत अक्षेप नोंदविण्यासाठी जहिरात दिलेली होती. परंतू कुणीही अक्षेप घेतलेला नसून आणखी लोकांनी नाव समावेश करून घ्यावे म्हणून अर्ज भरून दिलेले आहे.

मा. सभापती : वृत्तपत्रात जहिरात देवून काम होणार नाही. कारण जेबीपीएल मध्ये येतात ते पेपर वाचत नाही. त्यामूळे त्यांना माहिती होणार नाही त्यासाठी जनजगरण करावे. त्या संबधीचे पॉम्प्लेट वाटप करावे. रिक्षाद्वारे लाऊड स्पिकर लावून जनतेपर्यंत माहिती पूरवावी. जेणे करून जेलोक खऱ्या अर्थाने यात आहे ते सामील होतील.

श्री.मो.जवेद मो. इसाक :हा सर्वे चुकीचा असून जेउत्पन्नाची अट आहे तीपण चूकीची आहे. ५९१ रू. वर कोणाचेही मासिक उत्पन्न असते. साधा भिकारी भिक मागतो त्यांनाही २५ रू. वर रक्कम दिवसातून मिळते जवळपास मासिक उत्पन्न ७०० रू. होते.

मा.सभापती : ज्या ज्या लोकांची नावे यात आली नाही त्याची यादी सदस्यांनी दयावी. जर ते नियमात बसत असतील तर नक्कीच त्यांचा समावेश करून घेतला जईल.

श्री.मो.जवेद मो.इसाक : शहरातील अनेक जगांचे महापालिकेचे रस्त्यासाठी भुंसपादन केले, काही एफएसआय देवून जगा घेतली. त्यांचा मोबदला दिला गेला. अद्याप त्या रस्त्याचा विकास झाला नाही. रूंद झाले नाही. मागिल बैठकीत हा मुद्या मी उपस्थित केला होता.इतिवृत्तातही आलेले आहे.

सहा. संचालक(न.र.) : माहिती घेणे चालू आहे. ८-१५ दिवस लागतील.

श्री.मुजीब खान :चप्पा मस्जिद ते रोषणगेट ते आझाद चौक पर्यत जगा भूसंपादन केलेली आहे. आतापर्यत त्या रस्त्यावरील अतिक्रमण काढलेले नाही. ज्यांची जगा घेतली त्यांना घर बांधता येत नाही व त्यांना मोबदला ही दिला जत नाही.ते लोक त्रस्त आहे. या बाबत मार्ग काढावा.

मा. आयुक्त : मागिल दहा वर्षात एफएसआय च्या बदल्यात किंवा पैसेच्या मोबदल्या किती जगा घेतलेली आहे. व सध्या त्या जगेवर कुणाचे नाव आहे याची चौकशी केली जईल.

श्री.मुजीब खान : कोणत्या जगेतून डी.पी. रस्ता जणार आहे म्हणून ती जगा काही बिल्डर विकत घेतात.त्यात महानगरपालिकेचे नगररचना विभागातील अधिकारी त्यांना डायरेक्शन देतात. महापालिकेला जेंव्हा रस्ता करण्याची गरजपडते त्यांना पैसेही व एफएसआय ही दिला जतो असे अनेक उदाहरणे देता येतील. काही अधिकारी बिल्डर झालेले आहे. एक रस्ता कोणताही पूर्ण विकसीत होत नाही. हे बरोबर नाही.

श्री.मो.जवेद मो.इसाक :जे लोक जगा भूसंपादनाच्या संदर्भात कार्यालयात पैसे देतात त्यांची कामे नगररचना विभागाकडून तात्काळ होते.

श्री.मुजीब खान : एका व्यक्तीने अर्ज दिला होता. तिसऱ्या दिवशी मा. आयुक्ताच्या टेबल संचिका होती. १० वर्षापासून सदर व्यक्ती आजही त्रस्त झालेले आहे. जेदलाल असतात त्यांची संचिका ताबडतोब मंजूरीसाठी पूढे जते.

मा. आयुक्त : १० वर्षात किती ठिकाणची जगा भूसंपादीत केली व किती लोकांना मोदला दिला आहे. याची यादी ७ दिवसात मा. सभापती व आयुक्त दालनात संबधीत अधिकारी यांनी सादर करावी.

श्री.पुनमचंद बमणे : माझे वार्डात पाणी का सोडले नाही.

कार्य.अभियंता(पापु.) : हर्सूलचे पाणी आज सकाळी बंद केले दोन दिवसापासून नाही. ३५० एकूण नळ कनेक्शन आहे. त्यापैकी १० कनेक्शन धारक रेग्यूलर बील भरतात.

श्री.पुनमचंद बमणे : पाणीपूरवठा विभागाच्या वतीने कॅम्प लावावा. लोक पैसे भरण्यास उत्सूक आहे. त्या नागरीकाकडे मागील थकबाकी असेल परंतू एक वर्षापासून पाणीच दिले नाही तर बील भरणार का? हर्सूल टी पॉईन्ट ते हर्सूल पर्यत १० लक्षचे लाईनचे काम झालेले आहे का?माझ्या माहिती प्रमाणे काम न होताच संबधीत ठेकेदारानी बील घेतलेले आहे.

कार्य.अभियंता ( पापु.) : माहिती घेवून कळविले जईल.

श्री.मुजीब खान : कर आकारणी विभागाचे काही कर्मचारी माझ्या वार्डात आले होते. नागरीकाचे म्हणणे असे होते की अदयाप नोटीसेस दिल्या नाही. पुर्वीचा जे कर होता तो भरणा करून घ्यावा. दोन झोपडी मध्ये एक कुटूंब होते. घरचे प्रमूख यांचे निधन झाले. घरात दोन लहान मूले आहे. त्यांचे घरांना ४० हजर टॅक्स दिला. ते मुले दररोज४० ते ५० रू.

कमवितात इतका टॅक्स कसा भरणा म्हणून संबधीतांनी अनेक वेळा महापालिकेत विनंती केली. अशी अनेक प्रकरणे आहेत. त्याची वसूली होणार म्हणून बजेट मध्ये दाखवले आहे. असे किती प्रकरणे आहे याचा मा. सभापती मा. आयुक्तांनी कॅम्प आयोजित करून सर्वे होणे गरजेचे आहे.कर किती आकारला गेला व जगेवरील परीस्थिती काय याची पाहणी होणे गरजेचे आहे. ज्याही वर्षी वसूलीचे टारगेट ठेवतो तेवढी वसूली होत नाही. बॅलेन्स दिसून येते.

श्री.हिम्मतराव दाभाडे : वार्ड फ कार्यालयाच्या बाजूला एक लेडीज बार असून ते जगेवरील बांधकाम हे नाल्यावर १० ते १५ फुट जस्तीचे आहे. ते हटविण्यासाठी मी प्रश्न विचारला होता या बैठकीत उत्तर मिळणार होते. अतिक्रमण काढणार की नाही. महानगरपालिकेचे अधिकारी अतिक्रमण हटवित नसून बसण्यास मदत करतात असा माझा आरोप आहे.

मा. आयुक्त : येत्या बजेटमध्ये प्रशासकीय विभागाचे अधिकार सर्व वार्ड अधिकारी यांना त्याचे त्यांचे भागापूरते मर्यादीत देण्याचे प्रपोजकरीत आहे. बारचे लायसेन्स हे घेतलेले आहे का याची जिल्हाधिकारी यांचेकडे चौकशी केली जईल तसेच अतिक्रमण झालेले आहे काय याचीही चौकशी केली जईल.

श्री.हिम्मतराव दाभाडे : एकनाथनगर डी. पी रोडवर १०×१५ टपरी आहे. अनेक वेळा मागणी करून हटविलेली नाही.मागणी करूनही अतिक्रमण का काढले जत नाही.

मा. आयुक्त : या बाबतीत संबधीत अधिकारी यांनीमार्कींग करून कार्यवाही करतील.

श्री. विनायक पांडे : जमा मस्जेदच्या बाजूलाच हायमस्ट लावण्यात आलेला आहे. मागे प्रश्न उपस्थित केला होता. त्या बाबतीत उत्तर देणार होते.

मा. सभापती : मा. आयुक्त यांनी संबधीत अधिकारी यांना सूचना द्याव्यात.

सौ. लता दलाल :स्पेक एजन्सीच्या संदर्भात सर्वसाधारण सभा व स्थायी समितीमध्ये वारवांर चर्चा झाली. स्थायी समितीने कमेटी नियूक्त केली. त्यात आम्ही काही सदस्य तसेच श्री.फड साहेब होते. त्यांना वारंवार माहिती मागवून त्यांनी दिली नाही. माहिती दिली नाही तर आम्ही आमच्या पध्दतीने उत्तर देवू. असे अधिकारी जनतेची लुटमार करीत असतील तर योग्य नाही. पदाधिकारी झाले म्हणून मोठे झाले असे नाही. परंतू वार्डातील जनतेने आम्हाला लोकप्रतिनिधी म्हणून निवडून दिले असून एक जबाबदार अधिकारी उत्तर देण्यास टाळाटाळ करीत असतील तर यापूढे जनतेला घेवून आम्ही जे करता येईल ते करू. सिडको भागात सर्वेचे काम दिले आहे सदर एजन्सीकडे किती व कोणत्या संवर्गातील कर्मचारी आहेत. ते काय काम करतात याचे उत्तर मिळाले नाही. करारनाम्या नुसार काम चालू आहे की नाही हे मला विचारायचे होते. ६०० रू.ऐवजी ६ हजर टॅक्स आकारला गेला. अनेक लोकांच्या तक्रारी आलेल्या आहेत. हीच परीस्थिती सिडको भागात होवू नये ही इच्छा आहे. ८० टक्के घरांना जस्तीचा टॅक्स आकारणी केली. सर्वसामान्य नागरीकांना फटका बसलेला आहे.कर वसूल झाला नाही अनेक लोक तक्रारी देत आहे. नगरसेवकांना नागरीक विचारणा करीत आहे. माहिती विचारली असता दिली नाही. आता माहिती देण्यात यावी.कारण स्पेकचे कर्मचारी व त्यांचे पदाधिकारी यांनी चाल ढकल करण्याचे तसेच बदनाम करण्याचे काम केलेले आहे हा माझा आरोप आहे.

श्री.संजय शिरसाट : जे आरोप मा.उपमहापौर यांनी केला तो गंभीर आहे. जबाबदार पदाधिकारी यांना असे उत्तर देणे बरोबर नाही ते जे बोलत आहे ते इतिवृत्तात येणार आहे. मालमत्ता कराचे उद्दीष्ट २८ कोटीचे ठेवले. आजही वसूली बघीतली तर वाढ झालेली दिसून येत नाही. कराच्या बाबतीत नंतर बोलता येईल परंतू मा. उपमहापौर यांनी म्हटल्या प्रमाणे जे कूणी श्री. मुनीर नावाचे कर्मचारी आहेत त्यांची तात्काळ बदली करावी.

श्री.रविकांत गवळी : स्थायी समितीने अनेक निर्णय घेतले त्याची अमलबजवणी होत नाही. स्पेकच्या बाबतीत स. सदस्यासह कमेटी नियुक्त केली होती.हेरींग साठी आम्हाला बोलविणार नाही असे आयुक्तांचे आदेश आहे असे श्री. फड साहेब यांनी म्हटले होते. मा. सभापती यांनी समिती गठीत केली त्यांना अधिकार असतात की नाही. तसेच स्पेकला सिडको भागाचा सर्वेसाठी मान्यता दिली का ?

सौ. लता दलाल : किती कर्मचारी वर्ग आहे. ते काय काम करतात. त्यांची कॅटॅगिरी काय आहे. संपूर्ण खूलासा करावा.

डॉ. आशा बिनवडे : स्पेक एजन्सीच्या कामा बाबत आणखी काही बोलणे शिल्लक नाही असे वाटते. स. स.सौ. लता दलाल यांनी अनेक वेळा यावर चर्चा केलेली आहे. बोलून बोलून त्यांचा संय्यम संपला व त्याचा उद्रेक होतो. याचा निषेध केला पाहिजे अनेक वेळा या विषयावर चर्चा झाली पूढे काहीच होत नाही. स्पेक बरोबर जे करारनामा केलेला आहे त्या प्रमाणे काम झाले किंवा नाही त्याचा अहवाल घेतला पाहिजे चौकशी होवून कार्यवाही व्हावी. नसता आम्हीही सर्व सदस्य या सभागृहाचा सभात्याग करू.

मा. आयुक्त : जे कर्मचारी आहे त्यांचे नाव व त्यांची पात्रता याची यादी करून सर्व सदस्यांना दिली जईल.

सौ. लता दलाल : अस्थापनेवर कोणते कर्मचारी आहेत याची यादी स्पेककडे असेल लगेच मागवावी.

श्री.संजय शिरसाट : ज्या अर्थी एजन्सी त्या कर्मचाऱ्यांना दर महिण्याला पगार देते त्यांचेकडे कोणते कर्मचारी आहेत त्याची यादी असेल ती त्वरीत देण्याची कार्यवाही करावी.

मा. आयुक्त : यादी तयार असेल तर लगेच दिली जईल. नसेल तर उद्या देण्यात येईल.

सौ. लता दलाल : सन २००२ मध्ये या एजन्सी बरोबर कारारना झाला.त्यावेळी सिडको शहरात समावेश केलेले नव्हते.

मा. आयुक्त : सिडको महानगरपालिके मध्येच येते फक्त सेवा महानगरपालिकेकडे नव्हती. ती हस्तांतरण करून घेतली.

श्री.संजय शिरसाट : २००२ मध्ये स्पेक बरोबर करारनामा केला त्याप्रमाणे सिडको वगळून दिलेला आहे. एक वर्षाचा कालावधी दिला होता, त्यानंतर ६ महिण्याची मूदतवाढ दिली. करारनाम्याचा कालावधी संपलेला आहे तरी सर्वे झालेला नसून करात वाढ झालेली दिसून येत नाही.

मा. आयुक्त : जे कमेटी नियुक्त केली होती त्या कमेटीतील सदस्यांनी सर्व कागदपत्रे तपासून घ्यावी.

मा. सभापती : कर आकारणी बाबत ज्या तक्रारी असतील त्याचा निपटारा करण्यासाठी झोन अधिकारी यांना अधिकार दयावे.त्या त्या वार्ड कार्यालयाचे अधिकारी त्या त्या

भागातील तक्रारीची तारीख वेळ ठरवून सुनावणी घेवून निपटारा करतील. त्यांचे सोबत स्थायी समितीचे तीन सदस्यही राहतील. अनेक कराच्या प्रकरणात १५-२० वर्षापासून निपटारा झालेला नाही. संबधीत कर्मचारी यांची तात्काळ त्या विभागातून बदली करावी.

मा.आयुक्त :डायरेक्ट हेरींग झाल्यानंतर करयोग्य मूल्य फायनल करण्याचे अधिकार सदस्यांना नाही. तक्रार आली त्यात काय अडचण आहे. त्या बाबतीत डायरेक्शन देवू शकतात.

श्री.संजय शिरसाट : करयोग्य मूल्य निश्चित करण्याचे अधिकार स्पेक एजन्सीला व सदस्यांना नाही. श्री.फड यांना दिले आहे. झोनमध्ये जी कमेटी असेल तेथे स्पेकचे कर्मचारी राहतील. झोन अधिकारी तसेच सदस्यही उपस्थित राहतील सुनावणीची जी चर्चा होईल त्याचे मिनिटस् तयार होतील. त्यावर प्रशासनाचे अधिकारी यांनी योग्य निर्णय घ्यावा हे कमेटीचे म्हणणे आहे.

श्री.रविकांत गवळी : स्पेक एजन्सी हेरींग घेवून कर वाढवून देत आहे. त्यांना अधिकार दिलेले नाही.

मा. आयुक्त : स्पेकने सर्वे करणे, नोटीसेस देणे एवढेच काम आहे.ज्यांनी अपील असेल त्यावर निपटारा करण्याचे अधिकार वार्ड अधिकारी यांना असून तेच अंतिम निर्णय घेतील.

श्री.मुजेब खान : २७२ प्रकरणात ८० टक्के चूकीचा सर्वे झाला. कॅम्प लावून प्रत्यक्ष जगेवर पाहणी करून कर आकारणी केली तर योग्य होईल.एक वार्डात तीन दिवस कॅम्प ठेवून माहिती घेवून कर आकारणी करावी.

मा. सभापती : स्पेकने कर आकारणी केल्या संदर्भात ज्या ही तक्रारी असतील त्या सोडवण्यासाठी प्रत्येक वार्डात कॅम्प लावून प्रत्यक्ष जगेची पाहणी करावी. त्यात स्थायी समितीचे तीन सदस्य तसेच त्या त्या वार्डाच्या सदस्यांनाही बोलवून घ्यावे. योग्य तो निर्णय घ्यावा अशा सूचना देण्यात येत आहे.

मा. आयुक्त : ५ तारखेपासून वार्डात कॅम्प लावण्यात येईल.

श्री.मुजेब खान : एक वार्डात ३ दिवस कॅम्प आयोजित करावा त्या त्या वार्डातील स. सदस्यांना अगोदर कळवावे. जेणे करून ज्यांचा कर आकारणी संदर्भात तक्रार आहे त्यांना माहिती देता येईल.

सौ. लता दलाल : स्पेककडे सर्वेसाठी कर्मचारी वर्ग कसा असावा म्हणून करारनाम्यामध्ये नमूद होते. एक अभियंता, एक ट्रेसर, एक क्लर्क व एक शिपाई अशा प्रकारे चार कर्मचाऱ्यांचे पथक असावे असे ठरले होते. त्यांनी सर्वे केल्यानंतर त्यांचे जेष्ठ अभियंता असतील ते पाहणी करून दररोजचा रिपोर्ट दर आठवडयाला त्या त्या झोनला देतील व हा संपूर्ण रिपोर्ट संगणकामध्ये संकलण करून संगळीकडे ती यादी दाखविण्यास ठेवणार होतो. व व ते संगणकीकरण होवून त्याची यादी सर्वांना पाहण्यास मिळेल व त्या नंतर जर कूणाची तक्रार असेल तर त्याचे निवारण करण्यासाठी संबधीत एजन्सीचे ज्यांनी सर्वे केला ते अभियंता तसेच महानगरपालिकेचे अधिकारी व संबधीत तक्रारदार हे सुनावणीच्या वेळी हजर राहतील. असा नियमात होते.टेक्नीकल कर्मचारी स्पेक एजन्सीकडे सर्वेसाठी नव्हते. १०वी, १२वी पास असलेली मुले यांनी सर्वेचे काम केलेले आहे. एकाच घरात दोन व्यक्ती राहत असतील तर एकाच मालमत्तेला दोन

व्यक्तीच्या नावाने टॅक्स दिलेला आहे. स्पेक एज्न्सीला महानगरपालिकेने जगा देवून ही त्यांनी जस्तीचा वेळ लावला व यात महानगरपालिकेच्या उत्पन्नावर परीणाम झालेला आहे. तांत्रिक कर्मचारी वर्ग नाही म्हणून श्री. वाहूळ यांचे मी निदर्शनास आणून दिले होते. अशीच परीस्थिती सिडकोतील सर्वेचे काम देवून झाली तर महानगरपालिकचे मोठे नुकसान होईल.व तेथील नागरीकावरही असाच अन्याय होईल. कर्मचाऱ्याच्या बाबतीत मी माहिती मागविली आहे ती देण्यात यावी.

श्री.रविकांत गवळी : २२ महिण्यापूर्वी भुखंड संदर्भात समिती गठीत केलेली होती. दोन वर्ष होत आहे . ३१ मार्च पर्यंत अहवाल येईल की नाही शंका आहे.याप्रकरणाची चौकशी करण्यासाठी समितीत श्री.खैरनार, श्री. राठोड यांचा समावेश होता. त्यानंतर त्यांचे नाव रद्य करून श्री. पवार लेखाधिकारी तसेच उपआयुक्त महसूल श्री.आनंदकर यांचेकडे चौकशीचे काम दिले होते.

मा. सभापती : या संबधीचा अहवाल ३१ मार्चच्या पूर्वी देण्याची कार्यवाही करावी.

श्री.दिलीप गायकवाड : शहरात अनधिकृत मोबाईल टावर्स किती आहेत.

सहा.संचालक(न.र.) : नगररचना विभागाकडे मोबाईल टावर्स परवानगीसाठी आलेले प्रस्ताव ११७ असून परवानगी एका ही टावर्स दिलेली नाही.

श्री.मधुकर सावंत : ११७ टावर्स शहरात असून ते अनधिकृत रित्या उभे असून त्यापैकी किती लोकांनी महानगरपालिकेकडे परवानगीसाठी पैसे भरणा केलेले आहे.

श्री.हिम्मतराव दाभाडे : ११७ टावर्सला परवानगी दिलेली नाही. टावर्स आज्ही उभे आहे. परवानगी जरी नसेल तरी याची आतून परवानगी चालू आहे.

सहा. संचालक(न.र.) : या संदर्भात उच्च न्यायालयात प्रकरण चालू आहे कार्यवाही करू नये म्हणून नुकतेच आदेश प्राप्त झाले आहेत.

श्री.संजय शिरसाट : कोणत्या कंपनीच्या टावर्स बाबत उच्च न्यायालयात वाद चालू आहे. कोर्टाचे आदेश काय आहेत याचा खूलासा करावा.

श्री. मुजीब खान : एका कंपनीच्या संदर्भात कोर्टात वाद असेल इतर कपंनीच्या टावर्स संदर्भात सर्वे करावा. योग्य अशा ठिकाणी परवानगी दिली पाहिजे जेउत्पन्न येणार होत तेही यामूळे येत नाही. त्या कपंनीच्या मनमानीपणे मंदीर, मस्जेद समोर अनधिकृतपणे टॉवर्स उभारले जवू नये.

मा. आयुक्त : या संदर्भात एक बैठक घेतली होती. प्रत्येक टावर्समध्ये ३हजर पर मीटर असावे असे काही तरी निर्देश आहे. प्रत्येक टावर्सचे ३ ते ४ लक्ष येते..एअरटेल कंपनीने राज्य शासन तसेच कोर्टापर्यत रेटच्या संदर्भात हे प्रकरण गेलेले असून शासनाचे पत्र आलेले आहे की या सदराखाली मोबाईल टॉवर्स डिस्टर्ब करू नये. शहरात ज्या घराच्या वर टावर्स आहेत त्यापैकी बऱ्याच घराचा भोगवटा प्रमाणपत्र घेतलेले नाही. त्यांची सेक्यूरीटी महत्वाची आहे. नोटीस दिल्या नंतर अनेक कंपनी टावर्स धारकांनी पैसे भरणा केलेले आहे. बीएसएनएल चे म्हटले की एकदम ४ लक्ष रू. आम्ही भरू शकत नाही. म्हणून शासनाकडे विनंती केली त्यानंतर त्यांनी १ लक्ष रू. भरणा केले आहे. रिलायन्स कंपनीने भरणा केलेले आहे. जरी भरणा केले असले तरी जेथे टावर्स त्या घराचा भोगवटा प्रमाणपत्र घेतलेले असावे. त्या मालमत्तेवर कर शिल्लक नसावा. एनओसी घेवून प्रमाणपत्र घ्यावयास पाहिजे अपार्टमेंन्टवर टावर्स असेल तर तेथील

लोकांना त्यांचे पैसे मिळत आहे. त्यांना नोटीस देवून मालमत्ता कर भरणा करून घेवू. बाकी मोबाईल कंपनीकडून पैसे भरून घेत आहे. परंतू एअरटेलच्या संदर्भात शासनाचे पत्र आहे, त्यांनी पैसे भरले नसेल तरी विस्कळीत करू नये.

श्री.रविकांत गवळी : टॉवर्स उभारणीसाठी परवानगीसाठी अर्ज करतात टॉवर्स चालू आहे. परवानगीसाठी अटी व शर्तीची पूर्तता करावी म्हणून कळविले जते परंतू ते पूर्तता करीत नाही व करणारही नाही. जेंव्हा हा मुद्दा स्थायी समितीमध्ये मांडला जतो त्यावेळेसच कंपनीला नोटीस दिली जते. त्यानंतर कोणतीही कार्यवाही होत नाही. ११७ टावर्स शहरात आहे. २ ते ४ टावर्सचे पैसे भरणा केले असेल. बाकीचे महापालिकेला पैसे न भरता चालू आहे.अशा टॉवर्स मुळे काही जीवीत हानी झाली तर त्यास जबाबदार कोण असणार आहे.

मा. आयुक्त : जीवीत हानी झाल्यास कंपनी जबाबदार राहील. सेक्यूरीटी घेतलेली आहे.

श्री.मुजीब खान : टॉवर्स कोणत्या जगेवर असावेत याचे निकष असतील. जर हवेने किंवा पावसाळयाचे दिवसात एखादा टावर खाली पडल्यानंतर जीवीत हानी होवू शकते. १० ते १२ टॉवर्स असे शहरात दिसून येतील त्यांचा सर्वे करावा. महापालिकेच्या खांबावर केबलचे वायर दिसून येते प्रत्येक घरातून २५०/- रूपये वसूली करीत लाखो रूपये कमवित आहे.महापालिकेला त्याचा फायदा होत नाही.

मा. आयुक्त : या बाबतचा सर्वे करण्यात येईल.

श्री.संजय शिरसाट :ज्या मालकांने भोगवटा प्रमाणपत्र घेतले नाही. जर इमारत पडली तर घरमालक जबाबदार राहतील. टावर्स पडला तर पैसे भरून जीवीत हानी भरून निघणार नाही.

मा. सभापती : या बाबतीत प्रशासनाने नियमानूसार कार्यवाही करावी. सभागृहात माईक सिस्टीम खराब झालेली असून श्री.पानझडे यांनी ताबडतोब या बाबत कार्यवाही करावी.

**विषय क्र.244 :**

दिनांक **6/2/2007** (का.प.क्र.21) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

श्री.मुजीब खान : मागिल बैठकीचे चार-पाच इतिवृत्त अद्याप देण्यात आलेले नाही.

उपआयुक्त (प्र.) : नगरसचिव श्री.एम.ए.पठाण रजेवर असतांना माझ्याकडे त्या पदाचा अतिरिक्त चार्ज होता. त्या काळात ज्या सभा झाल्या त्याचे इतिवृत्त नोंद करण्यात आलेले असून ज्यांनी नोंदी घेतल्या ते आजरी होते. त्यामूळे इतिवृत्त तयार होवू शकले नाही. ते तयार केले जईल.

श्री.मुजीब खान : जकात खाजगीकरणाचा ठेका दिला त्यास माझा विरोध आहे. तशी नोंद व्हावी.

मा. सभापती : विरोध नोंदवून घेण्यात येत आहे.

श्री.रविकांत गवळी : पान क्र ६ वर आपण रूलींग दिली होती त्याची अमलबजवणी झाली किंवा नाही.सिडको हडकोसाठी एक प्रशासकीय अधिकारी नियुक्त केले त्यांचे सोबत कोणता कर्मचारी दिलेले नाही. माहिती दिली तरी ही अमलबजवणी होत नाही.

प्रशासकीय विभागसक्षम करण्याचे तसेच अतिक्रमण काढण्या संसबधी स्पष्ट आदेश मा. सभापती आपण दिले होते १५ ते २० दिवस झाले त्या बाबत काय कार्यवाही केली खूलासा करावा.

मा. आयुक्त : पूर्वी सिडकोसाठी खाजगी सेक्यूरटी ठेवून अतिक्रमण काढले जत होते. अतिक्रमण काढण्यासाठी १ मार्च म्हणजे एक महिण्यासाठी आयुक्त म्हणून मी अधिकार दिले आहे.एक महिण्यात जेही अतिक्रमण असतील ते त्यांनी काढावे. एक एप्रिल पासून ते ३१ मार्च पर्यत एक वर्षासाठी नव्याने टेंडर काढून सभागृहासमोर ठेवावे म्हणून सूचना दिल्या आहे.महानगरपालिकेकडे सिडको हस्तांतरण झाल्यानंतर हे अतिक्रमण झालेले आहे.

श्री. रविकांत गवळी : प्रशासकीय विभाग सक्षम करण्यासाठी काय कार्यवाही केली. ७ इमारत निरीक्षक असून त्यापैकी आज४ काम करतात ३ गैरहजर आहे. अनेक ठिकाणी अधिकाऱ्याना अति. कार्यभार सोपविला चार इमारत निरीक्षक यांनी संपूर्ण वार्ड कार्यालयात काम पाहणार आहे का?

मा. आयुक्त : वार्ड अधिकारी यांना प्रशासकीय अधिकारी यांचे अधिकार द्यायचे आहे. प्रशासकीय अधिकारी म्हणून वार्ड अधिकारी काम करतील. ॲक्टमध्ये सुध्दा वॉर्ड अधिकारी यांना अधिकार आहे. १ एप्रिलपासून वार्ड अधिकारी यांना अधिकार देवू जेसात इमारत निरीक्षक आहे ते सूध्दा दिले जतील.

सौ.लता दलाल : इमारत निरीक्षक वार्ड अधिकारी यांचे अंडर मध्ये काम करणार अतिक्रमण झाल्याची माहिती देतील हे मान्य आहे परंतू वार्ड अधिकारी यांना अधिकार दिल्यानंतर प्रशासकीय अधिकारी काय काम करणार आहे.

मा. आयुक्त :सेन्ट्रल लेव्हलवर प्रशासकीय अधिकारी राहणार नाही. फक्त जेस्पेशल केसेस मध्ये पोलीस कर्मचारी मागवले ते द्यायचे व या विभागाचे बळकटीकरण करायचे एवढेच काम असणार आहे.

सौ. लता दलाल : नियम काय आहे ते बघावे त्यानूसारच ही कार्यवाही करावी.

श्री.मो.जवेद मो.इसाक : गरवारे कंपनी स्थलांतर होणार म्हणून बजेटमध्ये चार ते पाच कोटी कमी टारगेट ठेवलेले आहे असे प्रशासनाने म्हटले होते. आजपर्यत कंपनी स्थलांतर झालेली नाही. तसेच महाराष्ट्र डिस्टीलरीजचे गोडाऊन शहरा बाहेर गेलेले आहे असे म्हटले होते. माहितीच्या अधिकारात माहिती मागवली अद्याप दिली नाही. जेपर्यत गरवारे कंपनी स्थलांतरीत होणार नाही तोपर्यत जकातीचे टारगेट कमी करू नये. कंपनी चालू राहिल्यास ५ कोटी वाढवून घेणार का?

मा.आयुक्त : शहराचा वाढता व्याप लक्षात घेवून किती बजेट असावयास पाहिजे त्यानूसार १०१ कोटीचे टारगेट निश्चित केलेले आहे. मागिल वर्षी सहा महिण्यापासून गरवारेचे एक युनीट बंद तरी ठेकेदाराकडून कमी पैसे घेतलेले नाही. १०१ कोटीचे टेंडर आलेले आहे. उदया आणखी कंपनी बंद पडली तरी कमी पैसे घेणार नाही.

श्री.मो.जवेद मो.इसाक : जेपर्यत कपंनी शिप्ट होत नाही तोपर्यत ५ कोटी टारगेटमधून कमी करू नये.महाराष्ट्र डिस्टीलरीचे पैसे कमी येत आहे. गोडाऊन बाहेर गेले असे म्हटले माहितीच्या अधिकारात माहिती विचारली दिली नाही.

मा. सभापती : स. सदस्य यांना दोन दिवसात माहिती देण्यात यावी.

डॉ. आशा बिनवडे : जकातीचे खाजगीकरण झाले मागिल बैठकीत निर्णय घेतला त्या सभेचे इतिवृत्त आजकायम करण्यासाठी आले. परंतू दोन वर्षापासून जकात खाजगीकरण होत आहे. परंतू अनेक प्रश्नाची उत्तरे अदयाप मिळालेली नाही. जकात खाजगीकरणाची निविदा काढली यासाठी शासनाचे कोणते नियम अमलात आणले आहे. जकात संदर्भात नेहमीच चर्चा होते. जकातीचे उद्दिष्ट ठरावायचे कूणी व अंतिम करायचे कूणी यावर नेहमीच वाद होत असतो. स्थायी समितीकडे टारगेट निश्चित करण्यासाठी यायला पाहिजेअसे मत सर्वांनीच व्यक्त केले आहे. आयुक्त उद्दिष्ट ठरविता टेंडर काढले जते व अंतिम मंजूरीसाठी या सभागृहासमोर येते. टारगेट ठरविण्याचा अधिकार कुणास आहे याचाही खूलासा करावा.अधिनियम १९४९ चे नियम ९४, ९५ नुसार मा. आयुक्तांनी सभागृहासमोर अर्थसंकल्प सादर करायचा असतो. कलम ९५ नूसार स्थायी समिती त्यात फेरबदल करीत असते. उत्पन्न व खर्च या दोन्ही बाबी समाविष्ठ असतात. बजेट मध्ये जकातीचे उत्पन्नाविषयी येत होते खाजगीकरण होते म्हणून दोन वर्षापासून येत नाही. प्रकरण ड च्या ३५ नूसार जकात वसूली साठी खाजगी अभिकर्ता नियुक्त करण्याचे अधिकार आयुक्तांना आहे परंतू उद्दिष्ट ठरविण्याचे किंवा कायम करण्याचे अधिकार आयुक्तांना नाही.स्थायी समितीचे अधिकार असतांना का प्रस्ताव आला नाही.१०९ कोटीचे टारगेट अंतिम केले होते. उपआयुक्त महसूल यांनी या सभागृहात उत्तरे दिली. निविदा प्रक्रिया अत्यंत शितापीने त्यांनी पार पाडल्या एका बैठकीत पान क्र २७ वर उपआयुक्त यांनी सभागृहाला अशी माहिती दिली होती की १०१ कोटीचे टारगेट मागिल वर्षी पार पाडले.वाहन प्रवेश फिस वाढीचा प्रस्ताव शासनाकडे मंजूरी दिली तर पाच कोटीची वाढ होणार आहे.म्हणून ११६-११७ कोटी टारगेट होणार आहे.जर कंपन्या बंद पडल्या तर ७.५० कोटी कमी केलेले आहे. असे १०९ कोटीचे टारगेट आलेले होते. परंतू वाहन प्रवेश फिस शासनाने मंजूर केली नाही तर आणखी पाच कोटी कमी होणार १०६ कोटीवर टारगेट जणार आहे. १० टक्केनी नैसर्गीक वाढ धरता व पून्हा ७.५० कोटी कमी कसे होतील.यात महापालिकेचे मोठे नुकसान झालेले आहे.असे माझे मत आहे.

मा. आयुक्त : शासनास विचारले होते, महापालिकेसाठी शासनाचे स्वतंत्र निर्देश नाही. नगरपालिकेसाठी आहे. प्रोसेस केली ती नियमाने केलेली आहे. उद्दिष्ट किती ठेवायचे हे सर्वसाधारण सभा अंतिम करेल. प्रशासनाने उद्दिष्ट ठेवलेले नाही. जकातीचे किती उत्पन्न या शहराच्या माध्यमातून होवू शकते त्यांचा अंदाजकाढलेला आहे. त्यानुसार टेंडर मागविले. टेंडर स्थायी समितीच्या मंजूरीसाठी ठेवले होते जेठेवले तेवढे उत्पन्न या शहरातून जकातीचे मिळे हे योग्य वाटले म्हणून स्थायी समितीने त्यास मंजूरी दिली असा त्याचा अर्थ होतो. आपण संमती दिली म्हणजेइतके उत्पन्न मान्य केले. आम्ही उद्दीष्ट ठरवत नाही, अंदाजठेवतो.

डॉ. आशा बिनवडे : दोन वर्षापासून प्रशासनाचे हेच उत्तर समोर येत आहे. अर्थसंकल्पातील अंदाजहा ठरविण्यासाठी प्रथम स्थायी समितीसमोर यायला पाहिजे नंतर तो टेंडर काढून अंतिम करण्यात आला पाहिजे रिवाईज व अंतिम करण्याची संधी ठेवत नाही डायरेक्ट अंतिम मंजूरीसाठी सादर केले जते हे बरोबर नाही.

श्री.संजय शिरसाट : जर एखादे पाच लक्षचे काम असेल तर त्यांचे खर्च अदाजित काढता येतो त्यास अदांजम्हणू शकतो.

डॉ. आशा बिनवडे : यापूर्वी पाणीपट्टी, मालमत्ता कर, जकातीचे उद्दिष्ट निश्चित करण्यासाठी स्थायी समिती समोर येत असे खाजगीकरण करायचे म्हणून डायरेक्ट अंतिम मंजूरीसाठी येते हे बरोबर नाही.

मा. सभापती : सभागृहाच्या भावना लक्षात घेता जर पूढील वर्षी जकातीचे खाजगीकरण करायचे असेल तर अंदाज उद्दिष्ठ ठरवण्या प्रोसेस पासून त्यास स्थायी समितीची मंजूरी घेणे आवश्यक आहे.यापूढे जकात वसूलीचे खाजगीकरण करायचे असेल तर सुरूवातीच्या प्रोसेसपासून स्थायी समितीची मान्यता घ्यावी. इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

दिनांक **6/2/2007** रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.245 :**

**(दि. 6-2-2007 च्या सभेतील स्थगित ठेवण्यात आलेला प्रस्ताव - विषय क्र.226)**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, एन-2 रामनगर, सिडको येथे द्विवार्षिक पध्दतीने वृक्षसंवर्धन व विकास कामे करणे बाबतचे रक्कम रू.18,50,000/- चे अंदाजपत्रक सा.बां.खात्याच्या सन 2005-2006 च्या जिल्हा दरसुचीनुसार तसेच उद्यान विभागाच्या (पार्क व उपवने) सन 2004-05 च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले आहे. सदर कामाचा खर्च अर्थसंकल्प सन 2006-07 मधील सिडको भागात ग्रीन बेल्ट विकसीत करणे या लेखाशिर्षकाखाली असलेल्या तरतुदीतून करण्यात येणार आहे.

करीता एन-2 रामनगर, सिडको येथे द्विवार्षिक पध्दतीने वृक्षसंवर्धन व विकास कामे करणे बाबतचे र.रू.18,50,000/- चे अंदाजपत्रक मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.विनायक पांडे : १८ लक्ष खर्च करून द्विवार्षिक पध्दतीने वृक्षसंवर्धन व विकास कामे करणार आहोत. याचे संरक्षण करण्याची जबाबदारी कुणाची असेल हे नमूद केलेले नाही. हनुमान टेकडीवर वृक्ष सरंक्षणासाठी लाखो रूपये खर्च केले कालच तेथे वनवा पेटला जे कर्मचारी नियुक्त केले ते ही तेथे उपस्थित नव्हते. अग्निशमन विभागाची गाडी बोलविण्यात आली मी स्वत: तेथे उपस्थित होतो.

अति.शहर अभियंता : प्रस्ताव मंजूर केल्यानंतर निविदा काढल्या जतील. जे कुणी ठेका घेईल त्यांचेकडे दोन वर्षाची जबाबदारी दिली जणार आहे. त्यानंतर महानगरपालिकेला काम पहावे लागेल.

मा. सभापती : मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-2 रामनगर, सिडको येथे द्विवार्षिक पध्दतीने वृक्षसंवर्धन व विकास कामे करणेसाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.18,50,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.246 :**

**(दि. 6-2-2007 च्या सभेतील स्थगित ठेवण्यात आलेला प्रस्ताव - विषय क्र.231)**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, दि.1-8-2005 पासून औरंगाबाद शहरामध्ये वॉर्ड कार्यालयाची रचना करण्यात आली व त्यानुसार कचरा वाहतुकीची व्यवस्था करण्यात आली. परंतु शहराचा वाढता व्याप व लोकसंख्येमुळे कचरा वाहतुकीसाठीची वाहने कमी पडत असल्यामुळे व संपूर्ण कचरा उचलणे जरूरी असल्यामुळे मा.महापौर, मा.आयुक्त, मा.पदाधिकारी यांचे पाहणीनुसार वॉर्ड-ड मध्ये तीन व वॉर्ड-फ मध्ये दोन वाहने कचरा वाहतुकीसाठी कार्यरत करणे आवश्यक असल्यामुळे मा.आयुक्तांचे मंजुरीनुसार आरटीओ दराप्रमाणे भाडे दर रू.1940/- आठ तासाकरीता व जास्तीच्या प्रति तासासाठी रू.242/- प्रमाणे मे.राजेंद्रसिंग, औरंगाबाद, कंत्राटदार यांचे मार्फत लावण्यात आली. तसेच वॉर्ड-क मध्ये कार्यरत कचरा वाहतुकीचे वाहन क्र.एमएच-20/ए-6216 यास दि.30-11-2006 रोजी अज्ञात जमावाने नारेगांव येथे आग लावल्यामुळे सदरील वाहन अंशतः जळाले आहे. याबाबत दुरूस्तीसाठी प्रशासकीय कार्यवाही चालु आहे. परंतु सदरील वाहन दुरूस्त होईपर्यंत कचरा उचलण्यासाठी या वाहनाऐवजी वरील प्रमाणेच्या मंजूर दराने एक टिप्पर किरायाने लावणे जरूरी आहे.

करीता वरील प्रमाणेच्या दरास व वॉर्ड-फ, वॉर्ड-ड मध्ये किरायाने लावलेली वाहने कार्यरत ठेवण्यास तसेच वॉर्ड-क मध्ये एक टिप्पर किरायाने लावण्यासाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

मा. सभापती : किरायाने लावलेली वाहने मार्च अखेर (दि.31-3-2007) पर्यंत कार्यरत ठेवण्यास मान्यता देण्यात येते. यापुढे वाहने किरायाने लावण्याची आवश्यकता असल्यास तसा प्रस्ताव नव्याने सादर करावा.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार कचरा वाहतुकीसाठी लावण्यात आलेल्या, वॉर्ड-ड आणि वॉर्ड-फ मधील वाहनांसाठी रू.1940/- आठ तासाकरीता व जास्तीच्या प्रति तासासाठी रू.242/- प्रमाणे मे.राजेंद्रसिंग, औरंगाबाद, कंत्राटदार यांचे मार्फत लावण्यात आलेल्या वाहनांस तसेच वॉर्ड-क मध्ये कार्यरत कचरा वाहतुकीचे वाहन क्र.एमएच-20/ए-6216 हे दुरूस्त होईपर्यंत कचरा उचलण्यासाठी या वाहनाऐवजी वरील प्रमाणेच्या मंजूर दराने एक टिप्पर किरायाने लावण्यासाठी वरील प्रमाणेच्या दरास व वॉर्ड-फ, वॉर्ड-ड मध्ये किरायाने लावलेली वाहने मार्च अखेर (दि.31-3-2007) पर्यंत कार्यरत ठेवण्यास तसेच वॉर्ड-क मध्ये एक टिप्पर किरायाने लावण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.247 :</u>**

शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, संजयनगर व्यापारी संकुलातील दुकाने भाडेतत्वावर देण्यासाठी जाहीर लिलाव/निविदा पध्दतीने जा.क्र.मनपा/मामअ/2341/2006, दि.21-12-2006 रोजी स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीस दिली असता व दि.9-1-2007 रोजी मालमत्ता विभागात प्रत्यक्ष लिलाव सुरु केला असता दुकान क्र.7 साठी तीन व्यक्तींनी भाग घेतला व जास्तीची बोली श्री.अण्णासाहेब तनपुरे यांनी र.रु.570/- प्रती माह भाड्याची बोली बोलली आहे.

सदरील दुकानासाठी मनपाने दुकान भाडे रु.447/- प्रती माह असे निश्चित केले होते. संबंधीताने मनपाने ठरवुन दिलेल्या दुकान भाड्यापेक्षा जास्तीची बोली बोलली आहे. त्यानुसार संबंधीताकडून सेवाशुल्क रु.5/-प्रती चौ.मी. प्रती माह आकारुन नियमाप्रमाणे अनामत रक्कम व आगाऊ वार्षिक भाडे वसूल करुन करारनामा करुन घेण्यात येईल. करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संजयनगर व्यापारी संकुलातील दुकाने भाडेतत्वावर देण्यासाठी झालेल्या जाहीर लिलावात दुकान क्र.7 साठी श्री.अण्णासाहेब तनपुरे यांनी र.रु.570/- प्रती माह अशी जास्तीची बोली बोलल्याने संबंधीताकडून सेवाशुल्क रु.5/-प्रती चौ.मी. प्रती माह आकारुन नियमाप्रमाणे अनामत रक्कम व

आगाऊ वार्षिक भाडे वसूल करुन भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.248 :**

शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, जाफरगेट येथील व्यापारी संकुलातील दुकाने भाडेतत्वावर देण्यासाठी जाहीर लिलाव/निविदा पध्दतीने जा.क्र.मनपा/मामअ/2341/2006, दि.21-12-2006 रोजी स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीस दिली असता व दि.9-1-2007 रोजी मालमत्ता विभागात प्रत्यक्ष लिलाव सुरु केला असता दुकान क्र.11 साठी तीन व्यक्तींनी भाग घेतला व जास्तीची बोली सौ.सुनिता गणेश मिटकर यांनी र.रु.1625/- प्रती माह भाड्याची बोली बोलली आहे.

सदरील दुकानासाठी मनपाने दुकान भाडे रु.1563/- प्रती माह असे निश्चित केले होते. संबंधीताने मनपाने ठरवुन दिलेल्या दुकान भाड्यापेक्षा जास्तीची बोली बोलली आहे. त्यानुसार संबंधीताकडून सेवाशुल्क रु.5/-प्रती चौ.मी. प्रती माह आकारुन नियमाप्रमाणे अनामत रक्कम व आगाऊ वार्षिक भाडे वसूल करुन करारनामा करुन घेण्यात येईल. करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जाफरगेट येथील व्यापारी संकुलातील दुकाने भाडेतत्वावर देण्यासाठी झ ालेल्या लिलावात दुकान क्र.11 साठी सौ.सुनिता गणेश मिटकर यांनी र.रु.1625/- प्रती माह भाड्याची जास्तीची बोली बोलली असल्याने संबंधीताकडून सेवाशुल्क रु.5/-प्रती चौ.मी. प्रती माह आकारुन नियमाप्रमाणे अनामत रक्कम व आगाऊ वार्षिक भाडे वसूल करुन संबंधीतास भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.249 :**

शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, मालखरे क्लासिक, गारखेडा येथील व्यापारी संकुलातील दुकाने भाडेतत्वावर देण्यासाठी जाहीर लिलाव/निविदा पध्दतीने जा.क्र.मनपा/मामअ/2341/2006, दि.21-12-2006 रोजी स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीस दिली असता व दि.8-1-2007 रोजी मालमत्ता विभागात प्रत्यक्ष लिलाव सुरु केला असता दुकान क्र.1 साठी दोन व्यक्तींनी भाग घेतला व जास्तीची बोली श्री.दिलीप शामराव जाधव यांनी र.रु.2765/- प्रती माह भाड्याची बोली बोलली आहे.

सदरील दुकानासाठी मनपाने दुकान भाडे रु.2732/- प्रती माह असे निश्चित केले होते. संबंधीताने मनपाने ठरवुन दिलेल्या दुकान भाड्यापेक्षा जास्तीची बोली बोलली आहे. त्यानुसार संबंधीताकडून सेवाशुल्क रु.5/-प्रती चौ.मी. प्रती माह आकारुन नियमाप्रमाणे अनामत रक्कम व आगाऊ वार्षिक भाडे वसूल करुन करारनामा करुन घेण्यात येईल. करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मालखरे क्लासिक, गारखेडा येथील व्यापारी संकुलातील दुकाने भाडेतत्वावर देण्यासाठी जाहीर झालेल्या जाहीर लिलावात दुकान क्र.1 साठी श्री.दिलीप शामराव जाधव यांनी र.रु.2765/- प्रती माह अशी जास्तीची बोली बोलली असल्याने संबंधीताकडून सेवाशुल्क रु.5/-प्रती चौ.मी. प्रती माह आकारुन नियमाप्रमाणे अनामत रक्कम व आगाऊ वार्षिक भाडे वसूल करुन भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.250 :**

शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, सादिया टॉकीज मागील व्यापारी संकुलातील दुकाने भाडेतत्वावर देण्यासाठी जाहीर लिलाव/निविदा पध्दतीने जा.क्र.मनपा/मामअ/2341/2006, दि.21-12-2006 रोजी स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीस दिली असता व दि.8-1-2007 रोजी मालमत्ता विभागात प्रत्यक्ष लिलाव सुरु केला असता,

1. दुकान क्र.13-अ साठी चार व्यक्तींनी भाग घेतला व जास्तीची बोली श्री.सोहेल अहमद अली अहमद यांनी र.रु.835/- प्रती माह भाड्याची बोली बोलली आहे.
2. दुकान क्र.13-ब साठी चार व्यक्तींनी भाग घेतला व जास्तीची बोली श्री.सोहेल अहमद अली अहमद यांनी र.रु.790/- प्रती माह भाड्याची बोली बोलली आहे.

सदरील दुकानासाठी मनपाने दुकान भाडे अनुक्रमे रु.726/- व रु.709/- प्रती माह असे निश्चित केले होते. त्यानुसार वर दर्शविलेल्या दुकानांकरीता संबंधीताने मनपाने ठरवुन दिलेल्या दुकान भाड्यापेक्षा जास्तीची बोली बोलली आहे. तरी अ.क्र.1 व 2 नुसार संबंधीताकडून सेवाशुल्क रु.5/- प्रती चौ.मी. प्रती माह आकारुन नियमाप्रमाणे अनामत रक्कम व आगाऊ वार्षिक भाडे वसूल करुन करारनामा करुन घेण्यात येईल. करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सादिया टॉकीज मागील व्यापारी संकुलातील दुकाने भाडेतत्वावर देण्यासाठी झालेल्या जाहीर लिलावात दुकान क्र.13-अ साठी र.रु.835/- प्रती माह अशी व दुकान क्र.13-ब साठी श्री.सोहेल अहमद अली अहमद यांनी र.रु.790/- प्रती माह अशी जास्तीची बोली बोलली असल्याने संबंधीताकडून सेवाशुल्क रु.5/- प्रती चौ.मी. प्रती माह आकारुन नियमाप्रमाणे अनामत रक्कम व आगाऊ वार्षिक भाडे वसूल करुन संबंधीतास भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.251 :**

शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, साईनगर, सिडको येथील व्यापारी संकुलातील दुकाने भाडेतत्वावर देण्यासाठी जाहीर लिलाव/निविदा पध्दतीने जा.क्र.मनपा/मामअ/2341/2006, दि.21-12-2006 रोजी स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीस दिली असता व दि.8-1-2007 रोजी मालमत्ता विभागात प्रत्यक्ष लिलाव सुरु केला असता,

1. दुकान क्र.2 साठी तीन व्यक्तींनी भाग घेतला व जास्तीची बोली श्री.दिपक नथ्थुजी काकडे यांनी र.रु.3205/- प्रती माह भाड्याची बोली बोलली आहे.
2. दुकान क्र.3 साठी तीन व्यक्तींनी भाग घेतला व जास्तीची बोली श्री.भास्कर सुखदेव चव्हाण यांनी र.रु.2815/- प्रती माह भाड्याची बोली बोलली आहे.

सदरील दुकानासाठी मनपाने दुकान भाडे रु.2732/- प्रती माह असे निश्चित केले होते. त्यानुसार वर दर्शविलेल्या दुकानांकरीता संबंधीताने मनपाने ठरवुन दिलेल्या दुकान भाड्यापेक्षा जास्तीची बोली बोलली आहे. तरी अ.क्र.1 व 2 नुसार संबंधीताकडून सेवाशुल्क रु.5/-प्रती चौ.मी. प्रती माह आकारुन नियमाप्रमाणे अनामत रक्कम व आगाऊ वार्षिक भाडे वसूल करुन करारनामा करुन घेण्यात येईल. करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे साईनगर, सिडको येथील व्यापारी संकुलातील दुकाने भाडेतत्वावर देण्यासाठी झालेल्या जाहीर लिलावात दुकान क्र.2 साठी श्री.दिपक नथ्थुजी काकडे यांनी र.रु.3205/- प्रती माह व दुकान क्र.3 साठी श्री.भास्कर सुखदेव चव्हाण यांनी र.रु.2815/- प्रती माह अशी जास्तीची बोली बोलल्याने संबंधीताकडून सेवाशुल्क रु.5/-प्रती चौ.मी. प्रती माह आकारुन नियमाप्रमाणे अनामत रक्कम व आगाऊ वार्षिक भाडे वसूल करुन करारनामा करुन भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.252 :**

शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, पिया मार्केट, पहिला मजला, औरंगपुरा येथील व्यापारी संकुलातील दुकाने भाडेतत्वावर देण्यासाठी जाहीर लिलाव/निविदा पध्दतीने

जा.क्र.मनपा/मामअ/2341/2006, दि.21-12-2006 रोजी स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीस दिली असता व दि.9-1-2007 रोजी मालमत्ता विभागात प्रत्यक्ष लिलाव सुरु केला असता,

1. दुकान क्र.1 साठी नऊ व्यक्तींनी भाग घेतला व जास्तीची बोली श्री.हरीष प्रल्हादराव आनंतदास, यांनी र.रु.1550/- प्रती माह भाड्याची बोली बोलली आहे.
2. दुकान क्र.3 साठी तीन व्यक्तींनी भाग घेतला व जास्तीची बोली कु.कमल यसाजी दांडगे यांनी र.रु.690/- प्रती माह भाड्याची बोली बोलली आहे.
3. दुकान क्र.16 साठी सात व्यक्तींनी भाग घेतला व जास्तीची बोली श्री.चंद्रकांत भिमाजी नामेकर यांनी र.रु.1020/- प्रती माह भाड्याची बोली बोलली आहे.

सदरील दुकानासाठी मनपाने दुकान भाडे रु.540/- प्रती माह असे निश्चित केले होते. त्यानुसार वर दर्शविलेल्या दुकानांकरीता संबंधीताने मनपाने ठरवुन दिलेल्या दुकान भाड्यापेक्षा जास्तीची बोली बोलली आहे. तरी अ.क्र.1 व 3 नुसार संबंधीताकडून सेवाशुल्क रु.5/-प्रती चौ.मी. प्रती माह आकारुन नियमाप्रमाणे अनामत रक्कम व आगाऊ वार्षिक भाडे वसूल करुन करारनामा करुन घेण्यात येईल. करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पिया मार्केट, पहिला मजला, औरंगपुरा येथील व्यापारी संकुलातील दुकाने भाडेतत्वावर देण्यासाठी झालेल्या जाहीर लिलावात खाली दर्शविल्यानुसार जास्तीची बोली बोललेल्या बोलीधारकांना दुकाने भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

1. दुकान क्र.1 साठी श्री.हरीष प्रल्हादराव आनंतदास, यांनी र.रु.1550/- प्रती माह.
2. दुकान क्र.3 साठी कु.कमल यसाजी दांडगे यांनी र.रु.690/- प्रती माह.
3. दुकान क्र.16 साठी श्री.चंद्रकांत भिमाजी नामेकर यांनी र.रु.1020/- प्रती माह.

संबंधीताकडून सेवाशुल्क रु.5/-प्रती चौ.मी. प्रती माह आकारुन नियमाप्रमाणे अनामत रक्कम व आगाऊ वार्षिक भाडे वसूल करुन करारनामा करुन भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.253 :</u>**

शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, जय टॉवर, पदमपुरा येथील व्यापारी संकुलातील दुकाने भाडेतत्वावर देण्यासाठी जाहीर लिलाव/निविदा पध्दतीने जा.क्र.मनपा/मामअ/2341/2006, दि.21-12-2006 रोजी स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीस दिली असता व दि.10-1-2007 रोजी मालमत्ता विभागात प्रत्यक्ष लिलाव सुरु केला असता,

1. दुकान क्र.5 साठी तीन व्यक्तींनी भाग घेतला व जास्तीची बोली श्री.प्रशांत शेगावकर यांनी र.रु.3100/- प्रती माह भाड्याची बोली बोलली आहे.
2. दुकान क्र.6 साठी चार व्यक्तींनी भाग घेतला व जास्तीची बोली सौ.विमल प्रितमकुमार शेगावकर यांनी र.रु.4050/- प्रती माह भाड्याची बोली बोलली आहे.
3. दुकान क्र.7 साठी सात व्यक्तींनी भाग घेतला व जास्तीची बोली सौ.मंगला मिलींद हिवराळे यांनी र.रु.3060/- प्रती माह भाड्याची बोली बोलली आहे.
4. दुकान क्र.9 साठी तीन व्यक्तींनी भाग घेतला व जास्तीची बोली कु.भारती मनोहर साळवे यांनी र.रु.3560/- प्रती माह भाड्याची बोली बोलली आहे.
5. दुकान क्र.10 साठी तीन व्यक्तींनी भाग घेतला व जास्तीची बोली शेख गौसिया शेख सलीम यांनी र.रु.1790/- प्रती माह भाड्याची बोली बोलली आहे.
6. दुकान क्र.12 साठी तीन व्यक्तींनी भाग घेतला व जास्तीची बोली सौ.जयश्री ईश्वरचंद नांगरे यांनी र.रु.1760/- प्रती माह भाड्याची बोली बोलली आहे.

7. दुकान क्र.13 साठी तीन व्यक्तींनी भाग घेतला व जास्तीची बोली श्री.बाबुराव नामदेव वाकेकर यांनी र.रु.1900/- प्रती माह भाड्याची बोली बोलली आहे.

8. दुकान क्र.16 साठी तीन व्यक्तींनी भाग घेतला व जास्तीची बोली श्री.शेख इरफान शेख इसाकऊद्यीन यांनी र.रु.1785/- प्रती माह भाड्याची बोली बोलली आहे.

9. दुकान क्र.17 साठी तीन व्यक्तींनी भाग घेतला व जास्तीची बोली श्री.शेख इरफान शेख इसाकऊद्यीन र.रु.1780/- प्रती माह भाड्याची बोली बोलली आहे.

10. दुकान क्र.20 साठी पाच व्यक्तींनी भाग घेतला व जास्तीची बोली श्री.कमलाकर तुकाराम हट्टेकर र.रु.2560/- प्रती माह भाड्याची बोली बोलली आहे.

11. दुकान क्र.21 साठी चार व्यक्तींनी भाग घेतला व जास्तीची बोली श्री.अमोल अशोक जेऊरकर र.रु.2760/- प्रती माह भाड्याची बोली बोलली आहे.

12. दुकान क्र.22 साठी तीन व्यक्तींनी भाग घेतला व जास्तीची बोली श्री. शिवाजी महादेव काकडे यांनी रक्कम रु.1790/- प्रती माह भाड्याची बोली बोलली आहे.

सदरील दुकानासाठी मनपाने दुकान क्र.5, 6, 7 साठी आधारभुत भाडे अनुक्रमे रु.2875/-, 1525/-, 1430/- व दुकान क्र.9, 10, 12, 13, 16, 17, 20, 21 व 22 साठी रु.1716/- प्रती माह असे निश्चित केले होते. त्यानुसार वर दर्शविलेल्या दुकानांकरीता संबंधीतांनी मनपाने ठरवुन दिलेल्या दुकान भाड्यापेक्षा जास्तीची बोली बोलली आहे. तरी अ.क्र.1 ते 12 नुसार संबंधीताकडून सेवाशुल्क रु.5/-प्रती चौ.मी. प्रती माह आकारुन नियमाप्रमाणे अनामत रक्कम व आगाऊ वार्षिक भाडे वसूल करुन करारनामा करुन घेण्यात येईल. करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

मालमत्ता अधिकारी : यात क्र.१ मध्ये दुकान क्र ३ ऐवजी ५ असे वाचावे.

मा. सभापती : दुरूस्तीसह मंजूरी देण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जय टॉवर, पदमपुरा येथील व्यापारी संकुलातील दुकाने भाडेतत्वावर देण्यासाठी झालेल्या जाहीर लिलावात जास्तीची बोली बोललेल्या बोली धारकांना खाली नमूद केल्यानुसार भाडे आकारून भाडेतत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

1. दुकान क्र.5 साठी श्री.प्रशांत शेगावकर यांनी र.रु.3100/- प्रती माह.
2. दुकान क्र.6 साठी सौ.विमल प्रितमकुमार शेगावकर यांनी र.रु.4050/- प्रती माह.
3. दुकान क्र.7 साठी सौ.मंगला मिलींद हिवराळे यांनी र.रु.3060/- प्रती माह.
4. दुकान क्र.9 साठी कु.भारती मनोहर साळवे यांनी र.रु.3560/- प्रती माह.
5. दुकान क्र.10 साठीशेख गौसिया शेख सलीम यांनी र.रु.1790/- प्रती माह.
6. दुकान क्र.12 साठी सौ.जयश्री ईश्वरचंद नांगरे यांनी र.रु.1760/- प्रती माह.
7. दुकान क्र.13 साठी श्री.बाबुराव नामदेव वाकेकर यांनी र.रु.1900/- प्रती माह.
8. दुकान क्र.16 साठी श्री.शेख इरफान शेख इसाकऊद्यीन यांनी र.रु.1785/- प्रती माह.
9. दुकान क्र.17 साठी श्री.शेख इरफान शेख इसाकऊद्यीन र.रु.1780/- प्रती माह.
10. दुकान क्र.20 साठी श्री.कमलाकर तुकाराम हट्टेकर र.रु.2560/- प्रती माह.
11. दुकान क्र.21 श्री.अमोल अशोक जेऊरकर र.रु.2760/- प्रती माह.
12. दुकान क्र.22 साठी श्री. शिवाजी महादेव काकडे यांनी रक्कम रु.1790/- प्रती माह.

संबंधीताकडून सेवाशुल्क रु.5/-प्रती चौ.मी. प्रती माह आकारुन नियमाप्रमाणे अनामत रक्कम व आगाऊ वार्षिक भाडे वसूल करुन करारनामा करुन भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.254 :**

शहर अभियंता, मनपा औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, श्री.शेख शामद शेख अमीर, डॉ.सलीम अली सरोवर मत्स्य व्यवसाय ठेकेदार यांनी दि.11/9/2006 व दि.22/12/2006 अन्वये मा.महापौर यांच्याकडे दिलेला अर्ज व दि.4/1/2007 चा अर्ज देवुन विनंती पुर्वक अर्ज करुन डॉ.सलीम अली सरोवरातील मासळीची निविदा/बोलीचा आदेश मला जा.क्र.मनपा/मामअ/905/2006 दि.1/4/2006 रोजी रक्कम रु.6,65,000/- दि.1/4/2006 ते 31/3/2007 पर्यंतठेका देण्यात आला असुन त्यांनी आतापर्यंत ठेक्यापोटी रक्क्म रु.3,32,500/- व बँक गॅरंटीपोटी रक्कम रु.1,50,000/- असे एकूण 4,82,500/- भरलेले आहे. उर्वरीत रक्कम रु.1,82,500/- बाकी आहे.

परंतु गणपती विसर्जनाच्या वेळी काही नागरीकांनी व मंडळांनी गणपतीचे व इतर पुजेच्या साहित्याचे विसर्जन तलावात केल्यामुळे तलावाचे पाणी प्रदुषित झाले. त्यामुळे तलावातील माश्यांचे मोठ्या प्रमाणात मृत्यू झाल्यामुळे नुकसान झालेले आहे. निविदा/बोलीसाठी लागणारी रक्कम शेख शामद शेख अमीर यांनी कर्ज काढून भरलेली आहे. सदरील कर्ज त्यांना फेडणे हे मासे मोठ्या प्रमाणावर मृत्यू पावल्यामुळे भरणे शक्य झालेले नाही व उपासमारीची पाळी आलेली आहे. श्री.शेख शामद शेख अमीर यांनी एक वर्षाचा कालावधी मत्स्य व्यवसाय करण्यासाठी वाढवून देण्यासाठी अर्ज केलेला आहे.

त्यानुसार त्यांची विनंती विचारार्थ सादर केली असता मा.आयुक्त यांनी त्यांना पुढील सहा महिन्यासाठी (दि.1/4/2007 ते 30/9/2007 पर्यंत) कुठलीही फी न आकारता मत्स्य व्यवसाय करण्यासाठी मान्यता दिलेली आहे.

करिता दि.1/4/2007 ते 30/9/2007 पर्यंतच्या कालावधीसाठी डॉ.सलीम अली सरोवर येथे मत्स्य व्यवसाय करण्यासाठी श्री.शेख शामद शेख अमीर यांना विना मोबदला देण्यासाठीचा प्रस्ताव विचारार्थ सादर. मान्यता झाल्यानंतर वरील कालावधीसाठी करावयाचा करारनामा करण्यापुर्वी त्यांनी र.रु.1,82,500/- भरणे त्यांना बंधनकारक राहील.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ.सलीम अली सरोवरात गणेश विसर्जनाचे वेळी गणेशमुर्ती व इतर पुजेच्या साहित्याचे विसर्जन तलावात केल्यामुळे तलावाचे पाणी प्रदुषित होऊन माश्यांचा मोठ्या प्रमाणात मृत्यू झाल्याने संबंधीताचे नुकसान झाले असल्याने, डॉ.सलीम अली सरोवर येथे मत्स्य व्यवसायाचा ठेका घेणारे श्री.शेख शामद शेख अमीर यांना दि.1/4/2007 ते 30/9/2007 पर्यंतच्या कालावधीसाठी, करारनामा करण्यापुर्वी त्यांनी र.रु.1,82,500/- भरणे त्यांना बंधनकारक राहील या अटीवर विना मोबदला(कुठलीही फी न आकारता) मत्स्यव्यवसाय करण्याची परवानगी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.255 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, रोशनगेट या ऐतिहासिक दरवाजाची दुरुस्ती करणे या कामासाठी सा.बां.खात्याच्या सन 2005-2006 च्या दरसूचीनुसार सुधारीत अंदाजपत्रक र.रु.11,93,275/- चे तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2006-07 या आर्थिक वर्षात ऐतिहासिक दरवाजे या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. प्रस्तुत अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी शिफारस केली आहे व स्थायी समितीची मंजुरी घेणेबाबत आदेशित केले आहे.

तरी अंदाजपत्रक र.रु.11,93,275/- च्या मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.मुजेब खान : यापूर्वी गेट च्या संदर्भात निविदा काढली होती. ५ लक्ष ऐवजी ११.९३ लक्ष रोषणगेट साठी ठेवले होते. संचिका बघीतली असता त्यामध्ये रू.४७ ते ४८ स्क्वेअर मीटर प्रमाणे दिले शासनाचे दर रू.५० प्रमाणे आहे. त्यात कोणताही बदल केलेला नाही.

इतर कामे म्हणून ११,९३,२७५/- लक्ष वाढवून दिले. गेट सोडून दुसरे कोणतेही काम नाही चौक सुशोभिकरण संदर्भात ऑलरेडी टेंडर काढले आहे. सदर संचिका मा. आयुक्तांनी जतीने तपासावी अशी विनंती आहे. मी या संदर्भात पत्र ही दिलेले आहे.५ चे १२ लक्ष पर्यत काम होत आहे. दर दुरूस्त करून घ्यावे.

मा. आयुक्त : टेंडर काढल्यानंतर दर पृथःकरण करून आणू. इतरांचे डिटेल आणू.

श्री.मो.जवेद मो.इसाक : जे दर दिलेले आहे त्यानुसार तेवढया रेट मध्ये दरवाजची दुरूस्ती चांगल्या प्रकारे होणार नाही. रंगीनगेट व दिल्लीगेटचे सध्या काम चालू असून रंगीनगेटचे काम महापालिका करीत असून दिल्लीगेटचे काम डॉ. झकेरिया मॅडम करीत आहे. दोन्ही गेटच्या कामात फरक दिसून येत आहे.

मा. आयुक्त : टेक्नीकल पध्दतीने पूर्वी जसे होते तसेच करीत आहे.त्यामूळे खर्च वाढणार आहे. रंगीनगेट ज्या प्रमाणात खरोब झाले त्या प्रमाणे दिल्लीगेट जस्त खराब झाले नव्हते. त्यामूळे काम करण्यास वेळ लागत आहे परंतू चांगल्या प्रकारे दिसत आहे. काम चांगले होत आहे. दिल्ली गेटचे ही काम चांगले होत आहे.

श्री.रविकांत गवळी : हा प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नाही परंतू जे वस्तू पूर्वीच्या डिजईन प्रमाणे मिक्स करून काम करावयास पाहिजे तसे होत नाही. सिमेंन्ट पाणी व रेती याशिवाय दुसरे काहीच तेथे दिसून येत नाही.

मा. सभापती : अति.शहर अभियंता यांनी स.सदस्य श्री.रविकांत गवळी यांना सोबत घेवून गेटचे दुरूस्तीच्या कामाच्या ठिकाणी जवून भेट द्यावी. हा प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रोशनगेट या ऐतिहासिक दरवाजाची दुरुस्ती करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.11,93,275/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.256 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.1 अंतर्गत हर्सूल ते पिसादेवी मनपा हद्दीपर्यंत रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.9,95,500/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील काम तीन वर्षापुर्वी झालेले असून प्रस्तावित अंदाजपत्रकात डांबरीकरण करावयाच्या रस्त्याची लांबी 980 मीटर व रुंदी साधारण 4 मीटर आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 7 निविदापत्रके विकली गेली व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 5 निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1 | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | 18% जास्त दराने |
| 2 | के.बी. पाथ्रीकर | 25.21% जास्त दराने |
| 3 | ए.एस. कन्स्ट्रक्शन | 26.27% जास्त दराने |
| 4 | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | 28% जास्त दराने |
| 5 | एम. ए. सिद्यीकी | 30% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरानेक्षा 18% ने जास्त आहेत. डांबर खरेदीची बाजार भावाप्रमाणे दर विचारात घेऊन तुलना केली असता 13% जास्त दर येत आहेत. ज्यामुळे सदर कामावर अं.प.रक्कम रु.9,95,500/- पेक्षा जास्त म्हणजेच रु.11,24,915/- खर्च होणार आहे. यास मा.आयुक्तांनी शिफारस करुन प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर करण्याचे आदेशित केलेले आहे.

तरी मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 13% जास्त दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.1 अंतर्गत हर्सूल ते पिसादेवी मनपा हद्दीपर्यंत रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 13% जास्त दराची मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.257 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.9 मध्ये मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.9,97,750/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील काम तीन वर्षापुर्वी झालेले असून प्रस्तावित अंदाजपत्रकात डांबरीकरण करावयाच्या रस्त्याची लांबी 652 मीटर व रुंदी साधारण 7 मीटर आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 8 निविदापत्रके विकली गेली व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 2 निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1 | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | 28% जास्त दराने |
| 2 | एम. ए. सिद्दीकी | 35% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरानेक्षा 28% ने जास्त आहेत. डांबर खरेदीची बाजार भावाप्रमाणे दर विचारात घेऊन तुलना केली असता 13.05% जास्त दर येत आहेत. ज्यामुळे सदर कामावर अं.प.रक्कम रु.9,97,750/- पेक्षा जास्त म्हणजेच रु.11,27,956/- खर्च होणार आहे. यास मा.आयुक्तांनी शिफारस करुन प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर करण्याचे आदेशित केलेले आहे.

तरी मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 13.05% जास्त दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.9 मध्ये मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 13.05% जास्त दराची मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.258 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.94 अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.9,97,500/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील काम तीन वर्षापुर्वी झालेले असून प्रस्तावित अंदाजपत्रकात डांबरीकरण करावयाच्या रस्त्याची लांबी 550 मीटर व रुंदी साधारण 7 मीटर आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 7 निविदापत्रके विकली गेली व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 5 निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. त्यांचा तुलनात्मक तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1 | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | 15% जास्त दराने |
| 2 | ए. सी. कोठारी | 22.09% जास्त दराने |
| 3 | के.बी. पाथ्रीकर | 24.50% जास्त दराने |
| 4 | ए. एस. कन्स्ट्रक्शन | 25% जास्त दराने |
| 5 | आदिनाथ कन्ट्रक्शन | 25.86% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरानेक्षा 15% ने जास्त आहेत. डांबर खरेदीची बाजार भावाप्रमाणे दर विचारात घेऊन तुलना केली असता 12.49% जास्त दर येत आहेत. ज्यामुळे सदर कामावर अं.प.रक्कम रु.9,97,500/- पेक्षा जास्त म्हणजेच रु.11,22,088/- खर्च होणार आहे. यास मा.आयुक्तांनी शिफारस करुन प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर करण्याचे आदेशित केलेले आहे.

तरी मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 12.49% जास्त दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.94 अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्याचे पुनःडाँबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 12.49% जास्त दराची मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.259 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.64 क्रांतीचौक येथील विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.9,99,400/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील काम तीन वर्षापुर्वी झालेले असून प्रस्तावित अंदाजपत्रकात डांबरीकरण करावयाच्या रस्त्याची लांबी 840 मीटर व रुंदी साधारण 4.00 मीटर आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 9 निविदापत्रके विकली गेली व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 3 निविदापत्रके प्राप्त झाली. त्यांचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1 | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | 17.86% जास्त दराने |
| 2 | ए.एस. कन्स्ट्रक्शन | 22% जास्त दराने |
| 3 | एम. ए. सिद्यीकी | 22% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरानेक्षा 17.86% ने जास्त आहेत. डांबर खरेदीची बाजार भावाप्रमाणे दर विचारात घेऊन तुलना केली असता 11.98% जास्त दर येत आहेत. ज्यामुळे सदर कामावर अं.प.रक्कम रु.9,99,400/- पेक्षा जास्त म्हणजेच रु.11,19,128/- खर्च होणार आहे. यास मा.आयुक्तांनी शिफारस करुन प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर करण्याचे आदेशित केलेले आहे.

तरी आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 11.98% जास्त दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. 64 क्रांतीचौक येथील विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 11.98% जास्त दराची आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.260 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, एन-11 भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.9,88,800/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील काम सिडको विभागातर्फे साधारण तीन वर्षापुर्वी झालेले असून प्रस्तावित अंदाजपत्रकात डांबरीकरण करावयाच्या रस्त्याची लांबी 2140 मीटर व रुंदी साधारण 4.00 मीटर आहे. सदर कामासाठी दुस-या वेळेस निविदापत्रके मागविली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 3

निविदापत्रके विकली गेली व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 2 निविदापत्रके प्राप्त झाली. त्यांचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1 | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | 18.91% जास्त दराने |
| 2 | अरोरा कन्स्ट्रक्शन | बंद निविदाप्राप्त |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरानेक्षा 18.91% ने जास्त आहेत. डांबर खरेदीची बाजार भावाप्रमाणे दर विचारात घेऊन तुलना केली असता 13.35% जास्त दर येत आहेत. ज्यामुळे सदर कामावर अं.प.रक्कम रु.9,88,800/- पेक्षा जास्त म्हणजेच रु.11,20,804/- खर्च होणार आहे. यास मा.आयुक्तांनी शिफारस करुन प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर करण्याचे आदेशित केलेले आहे.

तरी आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 13.35% जास्त दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-11 भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 13.35% जास्त दराची आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.261 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.37 अंतर्गत विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.14,97,100/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील भागातील रस्त्यांचे काम तीन वर्षापुर्वी झालेले आहे. प्रस्तावित अंदाजपत्रकात डांबरीकरण करावयाच्या रस्त्याची लांबी 610 मीटर व रुंदी साधारण 3.50 मीटर आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 8 निविदापत्रके विकली गेली व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 4 निविदापत्रके प्राप्त झाली. त्यांचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1 | एम. ए. सिद्यीकी | 26.86% जास्त दराने |
| 2 | रे कन्स्ट्रक्शन | 28% जास्त दराने |
| 3 | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | 30.06% जास्त दराने |
| 4 | ए.एस. कन्स्ट्रक्शन | बंद निविदा |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी एम.ए. सिद्यीकी यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरानेक्षा 26.86% ने जास्त आहेत. डांबर खरेदीची बाजार भावाप्रमाणे दर विचारात घेऊन तुलना केली असता 13.37% जास्त दर येत आहेत. ज्यामुळे सदर कामावर अं.प.रक्कम रु.14,97,100/- पेक्षा जास्त म्हणजेच रु.16,97,262/- खर्च होणार आहे. यास मा.आयुक्तांनी शिफारस करुन प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर करण्याचे आदेशित केलेले आहे.

तरी एम.ए.सिद्यीकी यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 13.37% जास्त दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

अति.शहर अभियंता : यात २८.८६ जस्त दराने दिले आहे त्या ऐवजी २६.८६% अशी दुरूस्ती करावी.

मा. सभापती : दुरूस्तीसह मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.37 अंतर्गत विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 13.37% जास्त दराची एम.ए. सिद्यीकी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.262 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.81 मध्ये खडीकरण, डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रु.14,99,300/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील काम सिडको विभागामार्फत तीन वर्षापुर्वी झालेले असून प्रस्तावित अंदाजपत्रकात डांबरीकरण करावयाच्या रस्त्याची लांबी 750 मीटर व रुंदी साधारण 7 मीटर आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 9 निविदापत्रके विकली गेली व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी 3 निविदापत्रके प्राप्त झाली. त्यांचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1 | के.बी. पाथ्रीकर | 25.21% जास्त दराने |
| 2 | ए.एस. कन्स्ट्रक्शन | 28.21% जास्त दराने |
| 3 | आदिनाथ कन्स्ट्रक्शन | 28.86% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदा पत्रकापैकी श्री.के.बी.पाथ्रीकर यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरानेक्षा 25.21% ने जास्त आहेत. डांबर खरेदीची बाजार भावाप्रमाणे दर विचारात घेऊन तुलना केली असता 12.19% जास्त दर येत आहेत. यास मा.आयुक्तांनी शिफारस करुन प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर करण्याचे आदेशित केलेले आहे.

तरी श्री.के.बी.पाथ्रीकर यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 12.19% जास्त दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.81 मध्ये खडीकरण, डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 12.19% जास्त दराची श्री.के.बी.पाथ्रीकर यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.263 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.80 अंबिकानगर येथे अंतर्गत काँक्रीट रस्ते बांधणे, खडीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.73,07,000/- च्या अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभेची दि.11.8.2006 रोजी मंजुरी प्राप्त आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता सात निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1 | मे. शहा कन्स्ट्रक्शन | 6.00% जास्त दराने |
| 2 | मे. ए.आर. कन्स्ट्रक्शन | 7.00% जास्त दराने |
| 3 | श्री.ललीत दत्तात्रय अधाने | 8.25% जास्त दराने |
| 4 | मे.ॲसेन्ड कन्स्ट्रक्शन | 11.88 जास्त दराने |
| 5 | मे.एस.डी.कन्स्ट्रक्शन | 12 जास्त दराने |
| 6 | श्री.रुपेंद्रसिंग डी.जग्गी | 22 जास्त दराने |
| 7 | श्री. अब्दुल कदीर शेख | 27 जास्त दराने |

वरील प्राप्त निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची व अं.प.दरापेक्षा 6% जास्त दराची निविदा मे. शहा कन्स्ट्रक्शन यांनी दाखल केली आहे. सदर सर्वात कमी दराचे निविदाधारक यांचेशी वाटाघाटीनंतर मे.शहा कन्स्ट्रक्शन यांचे निविदा दर अंदाजपत्रकीय दराप्रमाणे मंजूर करण्यात आले आहेत.

तरी सदर कामासाठी मे.शहा कन्स्ट्रक्शन यांचे आंजपत्रकीय दराची निविदा मान्यतेस्तव विचारार्थ सादर. सदरील खर्च दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत करण्यात येईल.

**संवाद :**

| | |
|---|---|
| श्री.मधुकर सांवत | : ७३ लक्ष रूपये एकाच वार्डात व कोणत्या फंडातून खर्च होणार आहेत. |
| मा. सभापती | : संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा. |
| अति.शहर अभियंता | : दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत शासनाकडून महापालिकेला या कामासाठी निधी उपलब्ध झालेला आहे. |
| श्री.मधुकर सावंत | : १.५० कोटी रूपये शासनाकडून या योजनेसाठी येतात. एकाच वार्डात दलित वस्ती आहे का? या शहरात ५० ते५२ स्लम भाग आहे, तेथे या योजने अंतर्गत काम करण्याची गरजनाही का? माझ्या माहिती प्रमाणे एकाच वार्डात गेल्या वर्षी ९० लक्ष रूपये, या वर्षी ७३ लक्ष रूपये, पुढील वर्षी आणखी निधी खर्च होईल. शासनाकडून दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत निधी येतो. या संदर्भात प्रशासनाने सर्व सदस्यांना कल्पना देणे आवश्यक होते. |
| अति.शहर अभियंता | : सदर प्रस्ताव दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत प्रथम सर्वसाधारण सभेसमोर आलेला होता. |
| श्री.मधुकर सावंत | : शासनाकडून या योजनेसाठी १.५० कोटी रूपये येतात व इतर वार्डातील स.सदस्यांना तसे पत्र देवून कळविले नाही. एकाच वार्डात दरवर्षी हा निधी का खर्च केला जत आहे. हे काम रद्द करावे. सर्वच स्लम भागात ५ ते १० लक्ष पर्यतचे काम करण्यात यावे. कोणत्याही वार्डात विकास कामे होत नाहीत. दोन वर्षात माझ्या वार्डात १० लक्षचेही काम झालेले नाही. |
| डॉ.आशा बिनवडे | : पुढच्या वर्षी सर्वांना विचारणा करावी. हा प्रस्ताव आता मंजूर करावा. |
| श्री.मुजेब खान | :अंबिकानगर हा स्लम भाग की गुंठेवारीमध्ये येतो. |
| सहा.संचालक (न.र.) | : हा भाग गुंठेवारीत येतो. |
| श्री.मुजेब खान | : एका वार्डाबाबत एक निर्णय, दुसऱ्यासाठी वेगळा निर्णय घेणे कितपत बरोबर आहे. शासन सांगते गुंठेवारी भागात आमदार निधी वापरू नये. हे काम एकाच वार्डात गुंठेवारीच्या भागात कसे होत आहे. या वस्तीमध्ये काम होण्यास विरोध नाही, परंतू इतरही सर्व दलीत वस्तीमध्ये या योजने अंतर्गत काम होणे गरजेचे आहे. |
| मा. सभापती | : स. सदस्यांच्या भावना लक्षात आलेली आहे. एका वर्षात जेकाही अनुदान येते. या संदर्भात सर्व सदस्यांना कल्पना देणे गरजेचे आहे. असे कळविले असते तर प्रत्येक नगरसेवकांना दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत ५ ते १० लक्ष पर्यतची कामे सुचविता आली असती. |
| मा. आयुक्त | : दलीत वस्ती सुधार योजना आहे, प्रत्येक वर्षी येते. डी.पी.डी.सी. मधून निधी येतो. |
| श्री.मधुकर सावंत | : या योजनेसाठी इतका निधी आला सर्व सदस्यांना त्याची माहिती देणे प्रशासनाचे कर्तव्य होते. |
| श्री.मिलींद दाभाडे | : एकाच वार्डात एवढी रक्कम खर्च करणे बरोबर नाही. यात भेदभाव झालेला दिसतो. मंजूर करू नये. |

श्री.मुजेब खान : डी.पी. डी. सी कडून हा निधी आलेला आहे. एका वार्डासाठी आलेला नाही. माझ्याही वार्डात दलीत वस्ती आहे. माझ्या वार्डात अशा पध्दतीने काम करण्याचा प्रस्ताव शासनाकडून मंजूर करून आणावा.

श्री.मधुकर सावंत : शासनाच्या जी.आर. मध्ये दोन अटी महत्वाच्या आहेत की, संबधीत वार्ड हा राखीव संवर्गातील असला पाहिजे या शहरात अनेक राखीव वार्ड आहेत. एकास एक न्याय दुसऱ्यास वेगळा न्याय कशासाठी?

मा. सभापती : यापुढे शासनाचा निधी आल्यानंतर कोणत्या भागासाठी आलेला आहे, याची माहिती सर्व सदस्यांना देण्याच्या सूचना केलेल्या आहेत. आता या विषयावर चर्चा करणे संयुक्तीक नाही.

श्री.मिलींद दाभाडे : हा प्रस्ताव रद्द करावा. सर्वच वार्डात कामे करावीत. संबधीत अधिकारी यांची भेट घेतल्यानंतरही माझ्या वार्डात एकही काम केलेले नाही.

मा.आयुक्त : हा निधी शासनाकडून मंजूर होवून आला म्हणून इतर वस्तीसाठी निधी मिळणार नाही अशातला भाग नाही.

श्री.मधुकर सावंत : माझे वार्डातील या योजनेतील कामे होण्यासाठी प्रस्ताव देतो तो प्रशासनाने मंजूर करून आणावा.

डॉ.आशा बिनवडे : सदरील प्रस्ताव मंजूर करावा. नसता या योजनेअंतर्गत शासनाचे अनुदान परत जईल म्हणून या प्रस्तावास मान्यता द्यावी.

मा. सभापती : या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. पुढच्या वेळी सर्व सदस्यांना अनुदान आल्याबाबत कळवावे. इतर वार्डातही अशा प्रकारचे काम होण्यासाठी तसा प्रस्ताव तयार करून मा.आयुक्ताच्या सहकार्याने आपणा सर्वाच्या मदतीने निधी मिळविण्याचा प्रयत्न केला जईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. 80 अंबिकानगर येथे अंतर्गत कॉंक्रीट रस्ते बांधणे, खडीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम मे.शहा कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.264 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.7 भिमनगर भावसिंगपुरा नाल्यातील मुख्य ड्रेनेज लाईन दुय्स्ती करणेच्या कामासाठी म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन 2005-06 च्या दरसूचीनुसार अंदाजपत्रक तयारकरण्यात आले असून, र.रु.12,77,505/- चे अंदाजपत्रक आहे. सदरील काम सन 2006-07 च्या लेखाशिर्ष मेन सिव्हर लाईन मधील उपलब्ध तरतुदीतून करण्यात येत आहे. त्यास मा.आयुक्तांनी दिनांक 7-2-2007 अन्वये मान्यता दिली आहे.

तरी रक्कम रु.12,77,505/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.7 भिमनगर भावसिंगपुरा नाल्यातील मुख्य ड्रेनेज लाईन दुय्स्ती करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.12,77,505/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.265 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.87 उल्कानगरी(आदित्यनगर) येथे सभागृह बांधणे करीता सा.बां.विभागाच्या सन 2005-06 च्या जिल्हा दरसूची नुसार रक्कम रु.18,49,235/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील अंदाजपत्रकास मा.आयुक्तांनी स्थायी समिती समोर सादर करण्याची शिफारस केलेली आहे.

सदरील कामाचा खर्च सन 2006-07 या आर्थिक वर्षात व्यापारी संकुले व इतर इमारती या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात येईल. त्यानुसार सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु.18,49,235/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.87 उल्कानगरी(आदित्यनगर) येथे सभागृह बांधणे करीता तयार करण्यात आलेल्या र.रू.18,49,235/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.266 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, नंदनवन कॉलनी येथे बॅडमींटन हॉल बांधणे करीता सा.बां.विभागाचे सन 2005-06 च्या जिल्हा दरसूचीनुसार रक्कम रु.13,00,000/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्यास स्थायी समितीने ठराव क्र.153 दि.7-11-2006 अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्या अन्वये सदरील कामास्तव कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र.मनपा/ई-निविदा/65/06 दिनांक 28-11-2006 अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 13 निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 3 निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दिनांक 18-12-2006 रोजी उघडण्यात आल्या, त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1 | आर. ए. वाहटुळे | 15% कमी दराने |
| 2 | स. मजीउद्यीन चिस्ती | 0.70% कमी दराने |
| 3 | मे. असेण्ड कन्स्ट्रक्शन | 2.70% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अं.प.दरापेक्षा 15% कमी दराची निविदा श्री.आर.ए. वाहटुळे यांची प्राप्त झालेली आहे. मा.आयुक्तांनी सदरील निविदा प्रस्ताव स्थायी समितीकडे सादर करणेबाबत शिफारस केलेली आहे. त्यानुसार श्री.आर.ए.वाहटुळे यांची अं.प.दरापेक्षा 15% कमी दराची निविदा प्रस्ता मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

डॉ. आशा बिनवडे : आधीचे हॉल तसेच पडून आहे. हा प्रस्ताव स्थगित करावा.

मा. सभापती : स्थगिती देण्यात येते.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चचनुसार सदरील प्रस्ताव स्थगित करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.267 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र सभागृहाचे नुतनीकरण करणे करीता सा.बां.विभागाच्या सन 2005-06 च्या जिल्हा दरसुची नुसार र.रु.15,00,000/- चे अंदाजपत्रकास स्थायी समिती सभा दि.7-11-2006 ठराव क्र.1582 अन्वये मान्यता प्राप्त आहे.

त्यानुसार या कामासाठी कार्यालयीन निविदा सूचना जा.क्र. मनपा/इ-निविदा/65/2006 दिनांक 28-11-2006 अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत 19 निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 09 निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. त्या दि.18/12/06 रोजी उपस्थित गुत्तेदारांसमक्ष उघडण्यात आल्या, त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| 1 | जाधव ए. एम. | 18.15% कमी दराने |

| | | |
|---|---|---|
| 2 | मोना कन्स्ट्रक्शन | 23.86% कमी दराने |
| 3 | काझी मुबारीजोद्यीन | 24% कमी दराने |
| 4 | शेख सलीम अहेमद | 16.15% कमी दराने |
| 5 | एस. एम. इब्राहीम | 17.5% कमी दराने |
| 6 | शेख महंमद अझहर | 18% कमी दराने |
| 7 | स. मजीउद्यीन चिश्ती | 23.50% कमी दराने |
| 8 | देशमुख एस. ए. | 22.22% कमी दराने |
| 9 | मेट्रो असोसिएट्स | 16.84% कमी दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 24% कमी दराची निविदा काझी मुबारीजोद्यीन यांची प्राप्त झालेली आहे. मा.आयुक्तांनी स्थायी समितीकडे सादर करणेबाबत शिफारस केलेली आहे. त्यानुसार काझी मुबारीजोद्यीन यांची अं.प.दरापेक्षा 24% कमी दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

<u>संवाद :</u>

श्री.मिलींद दाभाडे : मंजूरी देण्यात यावी.

श्री.रविकांत गवळी : अंदाजपत्रक तयार करून सुध्दा कमी दराच्या निविदा येतात.काम चांगले होईल याची जबाबदारी कूणावर असणार आहे.

मा. आयुक्त : कमी दराने करण्यास तयार आहे. चांगले काम केले नाही तर ऑडीटमध्ये येईल. संबधीतास काळया यादीत समाविष्ट केले जईल.संबधीत अधिकारी हे स्वत: जवून बघतील.

श्री.मधुकर सावंत : कमी दराने काम करण्यास तयार आहे. चांगले काम करणार नाही. पुन्हा शॉर्ट टेडर काढून कार्यवाही करावी.

मा. सभापती : हा विषय तुर्त स्थगित करण्यात येतो.

श्री.मिलींद दाभाडे : ज्या उद्देशाने हे रिसर्च सेंन्टर चालू केले त्या प्रकारचे कार्यक्रम घेतले जतात का? जे समन्वयक नियुक्त केले त्यांनी किती वस्तु तेथे आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. डॉ. बाबासाहेबांचे रिसर्च सेंन्टर म्हणून असतांना तेथे बैठका घेतल्या जतात सुवर्ण जयंती योजनेसाठी तेथे वापर केला जतो. तेथे पावित्र्य राखले जत नाही. त्यांचा मी निषेध करतो. यापूढे कार्यालयीन कामासाठी ते रिसर्च सेंन्टर वापरू नये नसता आम्ही सर्व आंबेडकरी जनता त्यास विरोध करू.

मा.सभापती : तेथे पावित्र्य राखले गेले पाहिजे दुमत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराजवस्तु संग्रहालय तसेच मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्रांत ॲक्टीव्हिटीजअसावयास पाहिजे मा. आयुक्ताशी माझी चर्चा झालेली होती. तेथे तीन्ही ठिकाणी विद्यार्थ्यासाठी या थोर नेत्यांच्या जेवनावर अधारीत असलेली पुस्तके ठेवावी. अशा प्रकारे आणखी काय करता येईल या बाबत लेखी स्वरूपात माझ्याकडे दयावे. त्यानुसार कार्यवाही करता येईल.

मा. आयुक्त : प्रत्येक रविवारी डॉ. बाबासाहेबा आंबेडकराच्या विचारांची देवाण-घेवाण होते. ज्या लोकांनी डॉ. आंबेडकरावर पुस्तके लिहिली त्यांचेसाठी बक्षीत देणार आहोत.वादविवाद स्पर्धा तसेच तेथे पथ नाटय स्पर्धा घेतलेली आहे. ॲक्टीव्हिटीज सुरू केलेल्या आहे. मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्रात पुस्तके विकत घेण्याची संचिका

क्लिअर केलेली आहे.दोन्ही संशोधन केंद्रांत ॲक्टिव्हिटीज देण्याचा आपला मानस आहे.

श्री.मुजेब खान : सदर ठिकाणी काय होत आहे. हे प्रशासनाच्या नजरेस आणून देण्याचे काम स. सदस्यांचे आहे. तेथे देखरेख करणारे कर्मचारी हजर नसतात. सध्याकांळ झाल्यानंतर तेथे महापालिकेचे अधिकारी कर्मचारी कुणीही नसतात.दुसरे बाहेरील लोक तेथे मस्ती मज करतात. दारूची बॉटल आणून दिली नाही म्हणून महापालिकेच्या एका कर्मचाऱ्यास मारहाण केली होती. ते प्रकरण दाबले गेले. तेथील संरक्षण करण्यासाठी प्रशासनाने सक्षम व्हावे. ज्या घटना घडत आहे त्या बरोबर नाही.

**ठराव :**

सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र.268 :**

कार्यकारी अभियंता (ड्रेविइवउ) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिडको भागातील एन-9, एच-सेक्टर सत्संग भवन ते प्लॉट क्र.19 पर्यंत नाला ट्रेनिंग करण्याचे कामाचे अंदाजपत्रक र.रू.30,17,135/- ला सर्वसाधारण सभा ठराव क्र.617 दि.15-12-2006 अन्वये मान्यता प्राप्त आहे. या कामाच्या निविदा बोलविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण 7 निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेस एकूण 7 निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| 1 | मे. तुषार कन्स्ट्रक्शन | 7.5% जास्त दराने |
| 2 | मे. एल.के.कन्स्ट्रक्शन | 10% जास्त दराने |
| 3 | मे. शहा कन्स्ट्रक्शन | 12% जास्त दराने |
| 4 | श्री.एस. एम. इब्राहीम | 15.5% जास्त दराने |
| 5 | मे.जयलक्ष्मी कन्स्ट्रक्शन | 29% जास्त दराने |
| 6 | मे.अमन असोसिएटस् | रजिस्ट्रेशन कॉपी नसल्याने निविदा उघडण्यात आली नाही |
| 7 | मे.रत्नगुरू कन्स्ट्रक्शन | रजिस्ट्रेशन कॉपी नसल्याने निविदा उघडण्यात आली नाही |

उपरोक्त निविदापैकी अं.प.दरापेक्षा 7.5% जास्त दराची निविदा तुलनात्मकदृष्ट्या कमी दराची आहे. मा.आयुक्त यांनी प्राप्त निविदा दराऐवजी अंदाजपत्रकीय दराने काम करण्यास दि.9-2-2007 रोजी मंजुरी दिली आहे.

तरी उपरोक्त नमूद शिफारशीनुसार सदरील कामासाठी अंदाजपत्रकीय दराची मे.तुषार कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकृतीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको भागातील एन-9, एच-सेक्टर सत्संग भवन ते प्लॉट क्र.19 पर्यंत नाला ट्रेनिंग करण्याचे कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम मे. तुषार कन्स्ट्रकशन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.269 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, संत एकनाथ रंगमंदिर येथील नुतनीकराणाच्या कामा अंतर्गत इमारतीच्या दर्शनी भागास म्युरल लावणे बाबतचा प्रस्ताव दिनांक 24-11-2006 रोजीच्या स्थायी समितीच्या बैठकीसमोर सादर करण्यात आलेला होता. सदरील प्रस्तावास मा.स्थायी समितीने विषय क्र.169 अन्वये मान्यता दिलेली होती. दि.16-12-2006 रोजीच्या बैठकीत विषय क्र.175 अन्वये दि.24-11-2006 चे इतिवृत्त कायम करण्यात आले तथापी दि.24-1-2007 विषय क्र.212 अन्वये दि.16-12-2006 रोजीचे

इतिवृत्त कायम करणे या विषया अंतर्गत सदरील प्रस्ताव पुनःश्च पुढील बैठकीत सादर करणे बाबत मा.स्थायी समितीने आदेश दिलेले होते.

त्यानुसार पुनःश्च प्रस्ताव सादर करण्यात येतो की, संत एकनाथ रंगमंदिर येथील नुतनीकरणाच्या कामांतर्गत मा.सभापती(स्थायी समिती) तथा या भागाचे स.नगरसेवक श्री.रेणुकादास वैद्य व मा.आयुक्त यांचे सूचनांप्रमाणे इमारतीच्या दर्शनी भागावर उठावदार शिल्प(म्युरल) लावण्याचे ठरले. यापुर्वी इमारतीच्या दर्शनी भागावर लावलेल्या आणि आकाराने लहान असलेल्या म्युरलची तुटफूट झाली होती. त्यामुळे आता नवीन प्रकारचे म्युरल लावण्याचे ठरल्यावरून प्रसिध्द रंगकर्मी(कलावंत) श्री.प्रशांत दामले यांनी केलेल्या सूचनांप्रमाणे शहरातील नामांकित म्युरल्स तयार करणाऱ्या कलावंताकडून रेखाचित्र आणि त्यांचे दर मागावून घेतले. त्यांचे पैकी मे.फोनिक्स आर्ट ॲण्ड क्राफ्ट यांचे रेखाचित्रास मा.सभापती(स्थायी समिती), मा.आयुक्त महोदय आणि मा.शहर अभियंता यांनी मान्यता दिली. त्यानुसार मे.फोनिक्स आर्ट ॲण्ड क्राफ्ट यांचेकडून दर मागविले असता, त्यांनी एम.एस.फॅब्रीकेशन मटेरिअल मध्ये म्युरल बसविण्यासाठी 10’ x 12’आकाराचे एक आणि 14’ x 3’आकाराचे एक असे दोन म्युरल्सचे प्रत्येकी रूपये 1,50,000/- आणि रूपये 65,000/- असे एकूण रूपये 2,15,000/- चे दरपत्रक दिले. मात्र संबंधीताशी वाटाघाटी करून दर कमी करून घेतले असून, संबंधीतानी सदर काम रू.1,60,000/- मध्ये करून देण्याचे मान्य केल्यानुसार दरास व रेखाचित्रास मा.आयुक्त यांनी मान्यता दिली आहे. तसेच वेळ वाचविण्याच्या दृष्टीने कामास सुरूवातही करण्यात आली आहे. तरी सदरचे काम मे.फोनिक्स आर्ट ॲण्ड क्राफ्ट यांचेकडून करून घेण्यास व रूपये 1,60,000/- चे खर्चास मान्यता व्हावी. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.मो.जवेद मो.इसाक : दुरूस्तीचे काम केंव्हा संपणार आहे. अनेक वेळा खर्चाचे प्रस्ताव येत आहे.

श्री.मुजीब खान :जेकाम करायचे ते होत आहे का? लाखो रूपयांचे बजेट होत आहे. २.५० कोटी खर्च ५७ हजर वसूली होत आहे. येणाऱ्या बजेटमध्ये नेहरूभवन च्या विकासाठी तरतूद करण्यात यावी.

मा. सभापती : याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे. मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संत एकनाथ रंगमंदिर येथील नुतनीकरणाच्या कामांतर्गत इमारतीच्या दर्शनी भागावर एम.एस. फॅब्रीकेशन मटेरिअलमध्ये उठावदार शिल्प (म्युरल) बसविण्यासाठी 10’x12’आकाराचे एक आणि 14’x3’आकाराचे एक असे दोन म्युरल्स बसविण्याकरीता वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरचे काम मे.फोनिक्स आर्ट ॲण्ड क्राफ्ट यांचेकडून करून घेण्यास व त्यासाठी लागणाऱ्या रक्कम रूपये 1,60,000/- चे खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.270 :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी सन 2006-07 साला करीता वार्षिक क्लोरीन पुरवठ्या संदर्भात तयार करण्यात आलेल्या र.रु.21,61,250/- चे अंदाजपत्रकास मंजुरी मिळाल्यानुसार वार्षिक क्लोरीन पुरवठ्या संबंधी निविदा प्रक्रीया करण्यात आली. निविदा प्रक्रीये अंतर्गत राज्यस्तरीय नियतकालीकातून निविदा प्रसिध्द करण्यातआली. या पुरवठ्या करीता एकुण चार निविदा विक्री झाल्या व शेवटच्या प्राप्तीच्या दिवशी तीन निविदा प्राप्त झाल्या. या तीन निविदा व त्यांचे प्राप्तदर खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | एजन्सीचे नांव | 900 कि.ग्रॅ.सिलेंडर | 100 कि.ग्रॅ.सिलेंडर |
|---|---|---|---|
| 1 | मधुमय उद्योग, मुंबई | रु.10800/- प्र.मे.टन | रु.44000/- प्र.मे.टन |
| 2 | रंग रसायन, पुणे | रु.10990/- प्र.मे.टन | रु.45000/- प्र.मे.टन |
| 3 | फोनिक्स केमीकल्स, औरंगाबाद | रु.12870/- प्र.मे.टन | रु.29900/- प्र.मे.टन |

**एकत्रित निविदा रक्कम**

**1) मधुमय उद्योग, मुंबई**

196 MT x 10800/- = 21,16,800.00
1.50 MT x 44,000/- = 66,000.00
Rs.21,82,800.00

**2) रंग रसायन, पुणे**

196 MT x 10990/- = 21,54,040.00
1.50 MT x 45,000/- = 67,500.00
Rs.22,21,540.00

**3) फोनिक्स केमीकल्स, औरंगाबाद**

196 MT x 12870/- = 25,22,520.00
1.50 MT x 29,900/- = 44,850.00
Rs.25,67,370.00

वरीलप्रमाणे प्राप्त निविदांचा तुलनात्मकदृष्ट्या विचार करता मे.मधुमय उद्योग, मुंबई यांची एकत्रित निविदा ही सर्वात कमी म्हणजेच रूपये 21,82,800/- किंमतीची आहे व प्राप्त दर हा 900 कि.ग्रॅ. सिलेंडर साठी रूपये 10800/- प्रति मे.टन व 100 कि.ग्रॅ. सिलेंडरसाठी रूपये 44,000/- मे.टन असा आहे. सदर प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर करण्याची शिफारस मा.आयुक्तांनी केली आहे.

वार्षिक क्लोरीन खेरीदचे मागील वर्षाचे मंजुर दर (900 Kg. सिलेंडरसाठी)

**सन 2005-06 रू. 13,241/- MT**

**सन 2004-05 रू. 16,973/- MT**

करीता उपरोक्त निवेद अंतर्गत वार्षिक क्लोरीन खेरीदसाठी मे.मधुमय उद्योग, मुंबई यांची सर्वात कमी दराची निविदा विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन 2006-07 साला करीता वार्षिक क्लोरीन पुरवठ्या संदर्भात प्राप्त निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची, म्हणजेच एकत्रित रूपये 21,82,800/- किंमतीची, (900 कि.ग्रॅ. सिलेंडर साठी रूपये 10800/- प्रति मे.टन व 100 कि.ग्रॅ. सिलेंडरसाठी रूपये 44,000/-) या दराची मे.टन मे.मधुमय उद्योग, मुंबई यांची निविदा स्विकारणे सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.271 :**

सहाय्यक संचालक नगर रचना, मनपा औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, दिल्ली गेटच्या पश्चिमेकडील 18.00 मीटर रुंद विकास योजना रस्त्यात बाधीत मिळकतीच्या क्षेत्राचे भूसंपादन करतांना तेथील सहा मिळकत धारकांना न.भू.क्र.7470, 7469, 7466, 7471, 7473/1 आणि 11451 मिळकती मधील बाधीत क्षेत्राच्या मोबदला रक्कमे ऐवजी हिराखान रेखांकनातील महानगरपालिकेच्या मालकीच्या न.भू.क्र.18349/1/100 जमीनीतील भूखंड देण्यात आले होते. त्यानुसार जमीनी बाबत अदलाबदल खरेदीखत करून भूसंपादनासाठी प्रक्रीया पूर्ण करण्यात आली होती. खरेदी खता आधारे पी.आर.कार्डवर संबंधीतांच्या नांवाच्या नोंदी करण्यात आल्या होत्या. परंतु मा.न्यायालयाने हिराखान रेखांकनातील महानगरपालिकेच्या मालकीची जागा न.भू.क्र.18349/1/100 मधील संबंधीतांना देण्यात आलेल्या भूखंडासंबंधी मनाई हुकूम दिल्याने भूखंड धारकांना तेथे बांधकाम करता आले नाही. सबब दिल्लीगेटच्या वरील नमुद मिळकत धारकांनी 18 मीटर रूंद रस्त्यात बाधीत क्षेत्रा ऐवजी दिलेले भूखंड त्यांना मिळाले

नसल्याने महानगरपालिकेतर्फे त्यांना दिल्लीगेटच्या पश्चिमेकडील 18 मीटर रूंद (50 फुट रूंद) विकास योजना रस्त्यात बाधीत क्षेत्राचा मोबदला खाजगी वाटाघाटीने देण्यासाठी सर्वसाधारण सभा दि.11-8-2006 मधील ठराव क्र.327 नुसार मान्यता मिळालेली आहे. सदरील मोबदला देण्यापुर्वी दिल्लीगेट येथील वरील सहा मिळकत धारकांना रितसर खरेदी खतानुसार हिराखान रेखांकनातील न.भू.क्र.18349/1/100 या महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेतील दिलेले भूखंड खरेदीखत करून परत घेणे आवश्यक आहे. वरील भूखंड संबंधीतांना मिळाले नसल्याने त्यांना तेथे बांधकाम करता आले नाही. यात त्यांची चुक नसल्याने खरेदी खाचा खर्च महानगरपालिकेने करणे संयुक्तीक आहे. खरेदी खताचा अपेक्षित खर्च खालील प्रमाणे होईल.

| अ.क्र. | न.भू.क्र. | भूखंड क्रमांक | भूखंडाचे क्षेत्र चौ.मी. | खरेदी खताचा सध्याच्या आर.आर. दराने येणारा अपेक्षित खर्च रूपये |
|---|---|---|---|---|
| 1 | 18349/1/100 पैकी | 30 व 31 | 173.00 | 52,400.00 |
| 2 | 18349/1/100 पैकी | 1 | 106.00 | 32,300.00 |
| 3 | 18349/1/100 पैकी | 3 | 47.25 | 14,720.00 |
| 4 | 18349/1/100 पैकी | 4, 5 व 6 | 141.75 | 43,040.00 |
| 5 | 18349/1/100 पैकी | 29 | 95.00 | 29,000.00 |
| 6 | 18349/1/100 पैकी | 2 | 47.25 | 14,720.00 |
| | | | एकूण रक्कम | 1,85,880/- |

प्रकरणी खरेदी खतासाठी येणारा एकुण खर्च रूपये 1,85,880/- (एक लक्ष पंचाऐंशी हजार आठशे ऐंशी फक्त) चा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दल्लीगेटच्या पश्चिमेकडील विकास योजना रस्त्याने बाधीत मिळकत धारकांनी 18 मीटर रूंद रस्त्यात बाधीत क्षेत्रा ऐवजी दिलेले भूखंड त्यांना मिळाले नसल्याने महानगरपालिकेतर्फे बाधीत क्षेत्रचा मोबदला देण्यापुर्वी दिल्लीगेट येथील प्रस्तावात नमूद केलेल्या सहा मिळकत धारकांना रितसर खरेदी खतानुसार हिराखान रेखांकनातील न.भू.क्र.18349/1/100 या महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेतील दिलेले भूखंड खरेदीखत करून परत घेण्यास तसेच या प्रकरणी खरेदी खतासाठी येणाऱ्या रक्कम रूपये 1,85,880/- (एक लक्ष पंचाऐंशी हजार आठशे ऐंशी फक्त) च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.272 :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेसाठी 50 मेगावॅट पवन उर्जा निर्मिती प्रकल्पाची प्लॅनींग, डिझाइन,उभारणी व संचलन करणे या कामाचा “Pre-investment” अहवाल तयार करण्यासाठी प्रस्तावास मा.आयुक्तांनी शिफारस केलेली आहे.

या कामासाठी EOI तत्वावर विविध एजन्सीकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्या संदर्भात दि.8/1/2007 रोजी Pre-conference meeting घेण्यात आली. या दरम्यान, प्रकल्पाचा अहवाल करण्याचे ठरले. त्यानंतर Indian Wind Engegy Association New Delhi ह्यांच्या प्रतिनिधी समवेत दि.23/1/2007 रोजी चर्चा झाली व Pre-investment अहवाल तयार करण्याबाबत त्यांना सुचित करण्यात आले. चर्चेत ठरल्यानुसार त्यांनी त्यांचे E-mail दि.2/2/2007 अन्वये कळविले आहे की, या कामासाठी रू.2.00 लक्ष खर्च लागेल. या “Pre-investment”अहवालामध्ये खालील बाबींचा समावेश आहे.

१. प्रकल्पाबाबत मनपास सहकार्य करणे.
२. विविध पर्यायाने मुल्यांकन करणे.
३. तीन सर्वोत्तम पर्यायाची शिफारस करणे.

४. प्रकल्पाच्या नमुन्याची (Model) ची शिफारस करणे.

अशा प्रकारचे काम करणाऱ्या तज्ज्ञ एजन्सीकडूनच काम करून घ्यावे लागते, त्यामुळे Indian Wind Engegy Association च्या रू.2.00 लक्ष चा प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेसाठी 50 मेगावॅट पवन उर्जा निर्मिती प्रकल्पाची प्लॅनींग, डिझाइन, उभारणी व संचलन करणे या कामाचा "Pre-investment" अहवाल तयार करण्याचे काम Indian Wind Engegy Association New Delhi या एजन्सीकडून करून घेण्यास व या कामासाठी लागणाऱ्या रक्कम रू.2.00 लक्ष खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 273 :**

नगर सचिव, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, सर्वसाधारण सभा, स्थायी समिती सभा व विविध विषय समित्यांचे सभेचे वेळी चहापान, अल्पोपहार व भोजन व्यवस्थेसाठी सर्वात कमी दराचे दरपत्रक असलेले पुरवठाधारक श्री.विजयकुमार यादवराव केदारे यांची निविदा असून त्यांना दि.24-4-2006 रोजी कार्यादेश देण्यात आलेला आहे. त्याची मुदत दि.31-3-2007 पर्यंत आहे. परंतु मा.महापौर यांनी दि.15-1-2007 रोजी पत्र देवून आदेशित केले की, सर्वसाधारण सभेसाठी श्री.केदारे यांचे ऐवजी जय केटरर्स मार्फत भोजनाची व्यवस्था करणेत यावी. त्या अनुषंगाने जय केटरर्स यांनी पत्र देवून प्रती व्यक्ती रु.50/- प्रमाणे दर कळविले होता. दि.20-1-2007 रोजीचे सर्वसाधारण सभेसाठी जय केटरर्स यांचे मार्फत व त्यानंतरच्या दि.22-1-2007 च्या विशेष सर्वसाधारण सभेसाठी पार्वती केटरर्स यांचे मार्फत जेवणाची व्यवस्था केली होती.

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जय केटरर्स यांचे देयक क्र.309 दि.25-1-2007 र.रु.13,750/- व पार्वती केटरर्स यांचे देयक क्र.354 दि.22-1-2007 र.रु.13,250/- चे संबंधीतांना अदाई करणेच्या कार्योत्तर मंजुरीस्तव प्रस्ताव सादर करण्यात येत असून यानंतर पुन्हः इतर पुरवठा धारकाकडून जेवण घ्यावयाचे झाल्यास नविन निविदा मंजूर होईपर्यंत रु.50/- प्रती व्यक्ती या दराने जेवण व्यवस्था करणेसाठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर. सदर प्रस्ताव स्थायी समिती सभेपुढे ठेवण्यास मा.आयुक्तांनी शिफारस केलेली आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सर्वसाधारण सभेसाठी श्री.केदारे यांचे ऐवजी दि.20-1-2007 रोजीचे सर्वसाधारण सभेसाठी जय केटरर्स यांचे मार्फत व त्यानंतरच्या दि.22-1-2007 च्या विशेष सर्वसाधारण सभेसाठी पार्वती केटरर्स यांचे मार्फत भोजन व्यवस्था करण्यात आल्यामुळे, जय केटरर्स यांचे देयक क्र.309 दि.25-1-2007 र.रु.13,750/- व पार्वती केटरर्स यांचे देयक क्र.354 दि.22-1-2007 र.रु.13,250/- चे संबंधीतांना अदाई करणेस कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. तसेच यानंतर पुन्हः इतर पुरवठा धारकाकडून जेवण घ्यावयाचे झाल्यास नविन निविदा मंजूर होईपर्यंत रु.50/- प्रती व्यक्ती या दराने जेवण व इतर अनुषंगीक (चहा, कॉफी, मिनरल वॉटर इ.) व्यवस्था करणेसाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.274 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सर्वसाधारण सभेच्या वेळी सभागृहात स.सदस्य मोबाईलचा वापर करतात त्यामुळे सभा सुरू असतांना संवाद साधण्यास अडचण निर्माण होते. सर्वसाधारण सभा हे शहराचे सर्वोच्च सभागृह असून या सभागृहाचे पावित्र्य राखणे हे सर्वच स.सदस्यांचे कर्तव्य आहे. याकरीता सभागृहात मोबाईल जॅमर बसविण्याची कार्यवाही करण्यात यावी, असे मा.महापौर यांनी त्यांचेकडील पत्र क्र.38/06, दि.7/12/2006 अन्वये कळविल्यानुसार, मा.आयुक्तांच्या मान्यतेप्रमाणे कै.केशव सिताराम ठाकरे सभागृहामध्ये मोबाईल जामर बसविण्यासाठी उपलब्ध स्थानिक पुरवठा धारकाकडून कोटेशन मागवून

मे.अपवर्ड सिस्टीम्स अँड सॉफ्टवेअर इंडिया प्रायव्हेट लि., औरंगाबाद यांचेमार्फत **DHP cell phone Jammer** बसविण्यात येऊन दि. 20/2/2007 रोजीच्या सर्वसाधारण सभेच्या वेळी त्याची प्राथमिक चाचणी घेण्यात आलेली आहे. सभागृहात बसविण्यात आलेल्या मोबाईल जामर संबंधीचा तपशील खालील प्रमाणे आहे.

**Double High powered 32 watt cell phone Jammer (DHP Jammer)**

| Specefication (DHP Jammer) | |
|---|---|
| **Jamming Range** | 40 to 120 meters<br>(Depends on signal strength, at the site to be jammed) |
| **Cellular Systems** | (CDMA) : 860-885<br>(GSM) : 925-960<br>(DCS, PHS) : 1800-1990<br>GSM/CDMA/PCS/TDMA/DCS/AMPS/NMTP/Nextel |
| **Power Supply** | 32 Watts 24 volts DC |
| **Dimension** | L 308 x W 186 x H 53 mm |
| **Net Weight** | 2 kg. |
| **Antenna** | Patch Panel antennas. |

वर दिलेल्या तपशीलानुसार बसविण्यात आलेल्या मोबाईल जामर साठी र.रू.1,48,000/- इतका खर्च येत असून, M/s **Upward Systems & Software India Private Ltd.**, Aurangabad यांचेकडून करून घेण्यात आलेल्या कामास तसेच त्यासाठीच्या खर्चास मा.आयुक्तांचे शिफारशी नुसार मुं.प्रां.मनपा अधिनियम 1949 चे अनुसूची-**ड** मधील प्रकरण 5 चे नियम 2 (2) अन्वये प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सर्वसाधारण सभेच्या वेळी संवाद साधण्यात अडचण येऊ नये याकरीता, कै.केशव सिताराम ठाकरे सभागृहामध्ये बसविलेल्या **DHP cell phone Jammer** यंत्रणेसाठी लागणाऱ्या र.रू.1,48,000/- च्या खर्चास तसेच M/s **Upward Systems & Software India Private Ltd.**, Aurangabad यांचेकडून करून घेण्यात आलेल्या कामास मुं.प्रां.मनपा अधिनियम 1949 चे अनुसूची-**ड** मधील प्रकरण 5 चे नियम 2 (2) अन्वये सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.275 :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रभाग क्र.15 स्वामी विवेकानंदनगर एम-12 या ठिकाणी 300 मीमी व्यासाची डीआयके-9 जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी र.रू.11,94,560/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.150 दि.7-11-2006 अन्वये मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार या कामासाठी निविदा सूचना क्र.65 दि.29-11-2006 अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत फक्त एकच निविदा विक्री झाली व स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एक निविदा दर भरून प्राप्त झाली. त्याचे दराबाबत तपशील खालील प्रमाणे.

**1. श्री.सुरेश बी.साधवानी 33.33% जास्त दराने**

उपरोक्त प्रमाणे प्राप्त निविदा ही श्री.सुरेश बी.साधवानी यांची असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 33.33% जास्त दराची आहे. एम.जे.पी., डीएसआर 2005-06, 2006-07 आणि लँको कंपनीचे दरासोबत तुलना केली असता हे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा 31.49% जास्तीचे दर येतात. म्हणजेच

अंदाजपत्रकीय रक्कमेमध्ये 31.49% वाढ झाली आहे. म्हणून श्री.सुरेश बी. साधवानी यांची अं.प.दरापेक्षा 31.49% जास्त दराची निविदा मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.15 स्वामी विवेकानंदनगर एम-12 या ठिकाणी 300 मीमी व्यासाची डीआयके-9 जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी प्राप्त झालेली श्री.सुरेश बी. साधवानी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 31.49% जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.276 :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, एन-2 वॉर्ड क्र.74 संघर्षनगर येथे 100, 200, 250 मीमी व्यासाची डीआयके-9 जलवाहिनी टाकण्यासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.18,72,909/- चे अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र.151 दि.7-11-2006 अन्वये मान्यता प्राप्त आहे.

त्यानुसार या कामासाठी निविदा सूचना क्र.65 दि.29-11-2006 अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत फक्त एकच निविदा विक्री झाली व स्विकारण्याच्या नियोजित तारखेस एक निविदा दर भरून प्राप्त झाली. त्याचे दराबाबत तपशील खालील प्रमाणे.

**1. श्री.सुरेश बी.साधवानी 33.33% जास्त दराने**

उपरोक्त प्रमाणे प्राप्त निविदा ही श्री.सुरेश बी.साधवानी यांची असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 33.33% जास्त दराची आहे. एम.जे.पी., डीएसआर 2005-06, 2006-07 आणि लँको कंपनीचे दरासोबत तुलना केली असता हे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा 28.35% जास्तीचे दर येतात. म्हणजेच अंदाजपत्रकीय रक्कमेमध्ये 28.35% वाढ झाली आहे. म्हणून श्री.सुरेश बी. साधवानी यांची अं.प.दरापेक्षा 28.35% जास्त दराची निविदा मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-2 वॉर्ड क्र.74 संघर्षनगर येथे 100, 200, 250 मीमी व्यासाची डीआयके-9 जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी प्राप्त झालेली श्री.सुरेश बी. साधवानी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 28.35% जास्त दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र.277 :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जाधववाडी येथे नियोजित वाहतुकनगर येथील वाहनतळासाठी आकारणी करावयाचे शुल्काचा दर पुढे नमूद प्रमाणे प्रस्तावित आहेत.

| अ.क्र. | वाहन प्रकार | पार्कींगचा दर |
|---|---|---|
| 1 | सर्व प्रकारची ट्रान्सपोर्ट वाहने, खाजगी प्रवासी बस व जड वाहने | रू.200/- प्रती वाहन प्रती दिन(24 तास) |
| 2 | सर्व प्रकारची ट्रान्सपोर्ट वाहने, खाजगी प्रवासी बस व जड वाहने | रू.100/- प्रती वाहन प्रती 8 तास |
| 3 | सर्व प्रकारची ट्रान्सपोर्ट वाहने, खाजगी प्रवासी बस व जड वाहने | रू.20/- प्रती वाहन प्रती तास |

तरी उक्त प्रमाणे वाहन तळ शुल्क दरास मान्यतेस्तव प्रकरण विचारार्थ सादर. तसेच शहरातील वाहन पार्कींगसाठी नमूद वाहन प्रकारासाठी दुप्पट दराने पार्कींग दर आकारणीस प्रकरण विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

मा.सभापती : ट्रान्सपोर्ट फिसच्या संदर्भात आहे.

मा. आयुक्त : १ तारखेपासून अंमलबजवणी होईल. अनेक रस्त्यावर ट्रक व इतर गाड्या उभ्या असतात. ट्रान्सपोर्ट नगर करणे गरजेचे आहे.

मा. सभापती : मंजूरी देण्यात येते.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे जाधववाडी येथे नियोजित वाहतुकनगर येथील वाहनतळासाठी खालील तक्त्यात दर्शविलेल्या दरानुसार वाहनतळ शुल्क आकारणी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | वाहन प्रकार | पार्कींगचा दर |
|---|---|---|
| 1 | सर्व प्रकारची ट्रान्सपोर्ट वाहने, खाजगी प्रवासी बस व जड वाहने | रू.200/- प्रती वाहन प्रती दिन(24 तास) |
| 2 | सर्व प्रकारची ट्रान्सपोर्ट वाहने, खाजगी प्रवासी बस व जड वाहने | रू.100/- प्रती वाहन प्रती 8 तास |
| 3 | सर्व प्रकारची ट्रान्सपोर्ट वाहने, खाजगी प्रवासी बस व जड वाहने | रू.20/- प्रती वाहन प्रती तास |

तसेच शहरातील वाहन पार्कींगसाठी नमूद वाहन प्रकारासाठी दुप्पट दराने पार्कींग दर आकारणी करण्यासही सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>संवाद :</u>**

सौ. लता दलाल : स्पेक या एजन्सीकडे ३०० ते ३५० कर्मचाऱ्याची यादी दाखवलेली आहे. उद्या या सर्व कर्मचाऱ्याना महापालिकेच्या ग्राऊडवर बोलवून माहिती करून घ्यावी अशी विनंती आहे.

मा. सभापती : प्रशासन याची दखल घेईल.

राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**

महानगरपालिका औरंगाबाद